

७ रमजान मुबारक

आज का इफ्तार ६.३५

कल की सहेर ५.२५


# पार्श्वभूमी


रियांश एन्टरप्राईजेस

नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.

50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील

पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.

Mob.9511511818



बीड वर्ष ३६ वे अंक ८८ वा फोन २३०१०१ दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ बुधवार — गंमत भंडारी — ई-पेपर : www.parshvbhumi.com — Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 — RNI Regd.no. MAHMAR/1990/501 — पाने ६ किंमत ४रु.


# घरच्या भाकरी सोबत घेऊन हजारो ठेवीदारांचा मुंबईत ठिय्या

## मालमत्ता जप्त करा, लिलावाची तारीख ठरवा, गरिबांचे पैसे द्या

बीड दि.२४ (प्रतिनिधी):- ज्ञानराधा, मॉ जिजाऊ, साईराम, राजस्थानी, छत्रपती, लक्ष्मीमाता, मातोश्री, मुक्ताई, मंगलनाथ व अन्य मल्टीस्टेटमध्ये महाराष्ट्रातील अनेक गोरगरीब ठेवीदारांचे पैसे अडकलेले आहेत. गेल्या दोन वर्षापासून ठेवीदारांचा हा संघर्ष चालू आहे. अनेक ठेवीदारांनी जीवन संपविलेले आहे. सरकारच्या वतीने फक्त आश्वासन दिले जाते, प्रत्यक्ष कारवाई होत नाही त्यामुळे संतप्त ठेवीदारांनी मुंबईच्या आझाद मैदानावर घरच्या भाकरी घेऊन हे आंदोलन केले. या आंदोलनाला आ.सुरेश धस, आ.संदीप क्षीरसागर, आ.विजयसिंह पंडित, आ.प्रवीण स्वामी, आ.सत्यजीत तांबे, आ.अभिजीत पाटील, आ.बबनराव लोणीकर यांनी भेट देऊन ठेवीदारांशी संवाद साधला आणि त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. ठेवीदारांचे प्रश्न मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे मांडणार अशी ग्वाही त्यांनी दिली.



### ८ दिवसात सर्व विभागांची बैठक घेऊ -आ.धस

जिल्ह्यातील मल्टिस्टेट व विविध पतसंस्थांमध्ये अत्यंत गोरगरीब ठेवीदारांची आयुष्यभराची पुंजी अडकली असून त्यामुळे त्यांना गंभीर आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ठेवी परत मिळाव्यात यासाठी ठेवीदारांना थेट मुंबईत आंदोलन करावे लागल्याची खंत व्यक्त करत आमदार सुरेश धस यांनी आंदोलकांना दिलासा दिला. या प्रकरणी दोन दिवसांत मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन संबंधित सर्व विभागांची संयुक्त बैठक मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आठ दिवसांत आयोजित केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. जप्त मालमत्तेचा लिलाव प्रक्रिया पान २ वर






### शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटणार -प्रा.सचिन उबाळे

ठेवीदारांचा सुरू असलेला हा लढा पैशांचा नाही, जगण्याचा आहे. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाशी आणि भवितव्याशी संबंधित आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने हस्तक्षेप करून ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी प्रा. सचिन भैय्या उबाळे पाटील यांनी केली. दरम्यान ठेवीदारांचे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहे.या प्रकरणी शासनाने तात्काळ कार्यवाही केली नाही तर धुळेसोलापूर राष्ट्रीय महामार्ग बंद करण्याचा इशारा देत उबाळे यांनी शासनाला अल्टिमेटम दिला आहे.

बीड जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या ज्ञानराधा, साईराम, छत्रपती, मा साहेब जिजाऊ लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन माजलगाव,शुभकल्यान सह इतर पतसंस्था व मल्टिस्टेट संस्थांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या ठेवी अडकल्या आहेत. ठेवी परत मिळण्यासाठी प्रा.सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली ठेवीदारांनी उपोषण, मोर्चे, पान २ वर

### भ्रष्टाचार लपविण्याची अफलातून आयडीया -कवचट

## बीडीओ सानप यांनी पाठविलेली चौकशी समिती गावात पोहोचलीच नाही

बीड दि.२४ (प्रतिनिधी):- तालुक्यातील परभणी केसापुरी येथील विविध कामांच्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व पुरावे गटविकास अधिकाऱ्यांकडे दिलेले असतांना त्यामध्ये चौकशीचे आदेश देण्याऐवजी त्यांनी सुनावणी ठेवल्याचा प्रकार यापुर्वी समोर आला होता. त्यानंतर आता त्याच प्रकरणात बीडीओ सानप यांनी चौकशीसाठी दि.२४ फेब्रुवारीची तारीख दिली होती. तक्रारदार आणि त्यांचे सहकारी सकाळपासून गावात समितीतील अधिकाऱ्यांची वाट पहात बसले, मात्र दिवसभर चौकशी समिती गावात पोहोचलीच नाही, या बाबत तक्रारदारांनी विविध अधिकाऱ्यांशी फोनद्वारे संपर्क केला असता गावच्या सरपंचांनी डॉक्टरची अपॉइंटमेंट असल्याचे पत्र दिल्याने समिती आली नसल्याचे सांगितले. यावरुन बीडीओ सानप यांना तक्रारदारापेक्षा आणि झालेल्या कामाच्या चौकशीपेक्षा सरपंचांचीच जास्त काळजी असल्याचे दिसून येत असल्याचा आरोप शिवाजी कवचट, दत्तात्रय कवचट यांनी पत्रकातून केला आहे. बीडीओंची भ्रष्टाचार लपविण्याची ही अफलातून आयडिया असल्याचा आरोप कवचट यांनी केला आहे.

बीड तालुक्यातील परभणी केसापुरी येथील विविध कामामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याची तक्रार शिवाजी माणिकराव कवचट यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी यांच्याकडे केली होती. या प्रकरणात बीडीओ सानप यांनी चक्क सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर त्यांनी चौकशीचे आदेश दिले. दि.२४ फेब्रुवारी रोजी चौकशी समिती गावात येईल असे देखील पत्र गटविकास अधिकारी सानप यांनी तक्रारदाराला दिले होते. पान २ वर

## निष्पाप सोहम डरफेंची सिग्मा रुग्णालयात मृत्युशी झुंज

### सिंदफणा नदीपात्रात वाळू माफियांचा नंगानाच

बीड दि.२३ (प्रतिनिधी):- मौजे कोपरा सिंधफणा नदीपात्रात अवैध वाळू उपसा करताना निष्पाप सोहम नारायण डरफे यांची सिग्मा हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यूशी झुंज सुरू आहे. सिंधपणा नदीपात्रात वाळू माफियांनी हैदास घातला आहे, कोपरा येथील निष्पाप सोहम नारायण डरफे हा सध्या मृत्यूशी झुंज देत असून तो दोन दिवसापासून कोमात आहे, सध्या संभाजीनगर येथे ते मृत्यूशी झुंज देत आहेत, सदरील घटना घडली तेव्हा त्याला कोपरा येथून काकू -नाना हॉस्पिटल येथे वाळू माफियांनी परस्पर ॲडमिट केले व तुमच्या मुलाला २-३ टाके पडले आहेत, असे सांगितले व तिथून पसार झाले पान २ वर

### बसस्टॅण्डवरचे एजंट लुटू लागले, एसीबीमध्ये अडकताल

## बीड, माजलगावमध्ये एसटीच्या सवलत कार्डसाठी १९९ ऐवजी २२० रुपये घेऊ लागले

माजलगाव दि.२४ (विशेष प्रतिनिधी):- एसटी महामंडळाच्या प्रवाशी सवलत कार्डाच्या नोंदणीस येथील बसस्थानकात सुरुवात झाली असून सकाळी ९ वाजेपासून दुपारी ५ वाजेपर्यंतच्या वेळेमध्ये नोंदणी केली जाणार आहे. एस.टी. महामंडळाने सवलत कार्डसाठी १९९ रुपयांची किंमत निर्धारीत केलेली असतांना देखील येथील बसस्थानकावर अनधिकृतपणे २२० रुपये आकारले जात आहेत. मात्र छापील पावती १९९ रुपयांची दिली जात असल्याने वरचे आगाऊ २० रुपये प्रति प्रवाशामागे कशापायी घेतले जात आहेत ? या बाबीचा खुलासा त्वरीतपणे एसटी महामंडळाच्या विभाग नियंत्रकांकडून केला जाणे अपेक्षित आहे. या बाबीचा अधिकृत खुलासा न झाल्यास कक्ष कर्मचारी व अधिकारी यांच्या संगनमताने जादा पैसे ओढत आहेत असेच समजले जाणार आहे. दरम्यान माजलगावप्रमाणेच बीडच्या बस स्टॅण्ड परिसरातही १९९ ऐवजी २०० रुपये घेतले जात आहेत. एसटी महामंडळाने ज्या काही एजंटांची नियुक्ती केलेली आहे तेच एजंट यामध्ये जास्तीचे पैसे आकारुन स्वत:चा गल्ला भरण्याचे काम करु लागले आहेत. सर्वसामान्य महिला या एजंटांच्या बोलण्याला आहारी पडत असल्याने त्यांची सर्रास पान २ वर

### फरार प्रदीप फाटे अजुनही सापडेना

## एस.पी.साहेब, शेवटी पोलिसांनी जाधवर कुटुंबावर उपोषणाची वेळ आणलीच

बीड दि.२४ (प्रतिनिधी):- मयत सचिन जाधवर आत्महत्या प्रकरणात जीएसटी विभागाचे अधिकारी प्रदीप फाटे याच्यावर गुन्हा दाखल होऊन महिना झाला तरीही तो अजुन पोलिसांना सापडला नाही. जाधवर यांच्या पत्नीने अनेक वेळा एस.पी.साहेबांची भेट घेतली, निवेदने दिली, विनंती केली तरीही फरार प्रदीप फाटे याला पकडण्यात पोलिसांनी थोडीही ताकद लावली नाही, त्यामुळे एस.पी.साहेब शेवटी तुमच्या पोलिसांनी जाधवर कुटुंबावर आजपासून (दि.२५ फेब्रुवारी) एस.पी.ऑफीस समोर उपोषण करण्याची वेळ आणलीच. बीड येथील जीएसटी विभागातील निरीक्षक सचिन जाधवर यांच्या आत्महत्या प्रकरणात २३ जानेवारी २०२६ रोजी प्रदीप फाटे याच्याविरुद्ध गुन्हा नोंद झालेला आहे. मात्र फाटेला अटक करण्यात पोलिसांना अजुनही यश आलेले नाही. विशेष म्हणजे बीड न्यायालयाने ११ फेब्रुवारी २०२६ रोजी फाटेचा अटकपुर्व जामिन अर्ज फेटाळून लावला आहे, तरीही बीडचे पोलीस फाटेला अटक करत नसल्याने सचिन जाधवर यांच्या पत्नी मयुरी जाधवर, नारायण धुराजी जाधवर, पान २ वर

### धांडे नगरमधील नाल्याचे १५ दिवसात फक्त १५० फुट काम

## बिल्डींग मालकाच्या पायऱ्या वाचविण्यासाठी चक्क नाला वळविला, रस्ताही कमी केला

बीड दि.२४ (प्रतिनिधी):- मोठ्या प्रतिक्षेनंतर बीड शहरातील बार्शी रोडवरील धांडे नगरच्या नाला कामाला सुरुवात झाली, सदरील रस्ता ६० फुटाचा असून तशी मार्किंग देखील करण्यात आली होती. मात्र एका बिल्डींग मालकाच्या पायऱ्या वाचविण्यासाठी नगर पालिकेने चक्क नाला वळवून रस्ता देखील कमी केला आहे. आता या बिल्डींग मालकासाठी कोणी वजन वापरले आणि कोणी ताकद लावली याचा शोध प्रशासनाने घ्यावा अशी मागणी होऊ लागली आहे. दरम्यान धांडे नगरच्या नाल्याचे काम अतिशय संथ गतीने सुरु असून १५ दिवसात केवळ १५० फुटाचेच काम झाले आहे. कामाच्या संथ गतीमुळे दुकानदारांना आणि नागरिकांना देखील त्याचा त्रास होऊ लागला आहे.



बीड शहरातील बार्शी रोडवरील धांडे नगरमधील मोठ्या नाल्याचा प्रश्न गेल्या ५ वर्षापासून प्रलंबित होता, निधी मंजूर असतांना सुद्धा हे काम रखडलेले होते. मोठ्या हौशेने काही दिवसापुर्वी नगर पालिकेने हे काम सुरु केले, मात्र नाला काम करत असतांना सोयीप्रमाणे वळण देखील घेतले आहे. धांडे नगरमधील हा रस्ता ६० फुटाचा आहे. तशी मार्कींग देखील करण्यात आली होती. त्यामुळे नाल्याचे काम सरळ रेषेत होणे अपेक्षित होते परंतु एका टोलेजंग बिल्डींग मालकाच्या पायऱ्या वाचविण्यासाठी चक्क नाला वळविण्यात आला आहे. पान २ वर



## बीडमध्ये न्यायालयाच्या आवारातच वकिलास मारहाण

### जिल्हाभरातील वकिलांचे आज काम बंद आंदोलन



बीड दि.२४ (प्रतिनिधी):- बीड जिल्हा न्यायालयाच्या आवारात न्यायालयीन कामकाज करत असतांना ॲड.राम पांडुरंग डोंगरे यांना राधाकिसन रामचंद्र करपे व इतर ५ ते ६ महिला पुरुषांनी मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार मंगळवारी सकाळी घडला. या प्रकरणानंतर संतप्त वकिलांनी मारहाण करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करुन त्यांना अटक करा अशी मागणी करत शिवाजी नगर पोलीस ठाण्यात धाव घेतली होती. या संदर्भात पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक यांनाही निवेदन देण्यात आले आहे. दरम्यान सदरील घटनेच्या निषेधार्थ जिल्हाभरातील वकील बांधव आज दि.२५ फेब्रुवारी रोजी काम बंद आंदोलन करणार असून न्यायालयीन कामकाजात सहभागी होणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पान २ वर


## महेश सहकारी साखर कारखाना लि.कडा

ता.आष्टी जि.बीड पीन 414208 (मराठवाडा)

Email-maheshsugar@gmail.com

दिनांक : 24/02/2026

### पाहिजेत

आमचे कारखान्यातील खालील पदे त्वरीत भरावयाची आहेत. तरी सदर पदावर अनुभव असलेल्या इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज शैक्षणिक पात्रता, अनुभव अपेक्षीत पगार कारखान्याचे ई-मेलवर पाठविण्यात यावी व दि.01/03/2026 रोजी वार रविवार या दिवशी दुपारी ठीक 12 वाजता कारखाना साईटवर सर्व कागदपत्रासह मुलाखतीसाठी हजर रहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रीक इंजिनिअर | 1 | बी.ई/डी.ई.ई. परिक्षा पास तसेच साखर कारखान्यातील सदर पदावर काम केलेला अनुभव |
| 2 | सुरक्षा गार्ड (महिला) | 6 | पदविधर/12वी पास सुरक्षा रक्षक काम केलेचा अनुभव (महिलांना प्राधान्य देण्यात येईल) |
| 3 | कॉम्प्युटर ऑपरेटर कम क्लार्क (महिला) | 3 | बी.सी.एस./एम.सी.एस./एम.एस.सी.आय.टी, कॉम्प्युटरचे सर्व ज्ञान व मराठी/इंग्रजी टाईपिंग येणे आवश्यक. (महिलांना प्राधान्य देण्यात येईल) |

कार्यकारी संचालक — चेअरमन

महेश सहकारी साखर कारखाना लि.कडा


## माजलगाव-तेलगाव रोडवर अज्ञात व्यक्तिंनी ऑईल जाणीवपुर्वक सांडले

### अपघातांची मालिका, ३० दुचाकी अपघातग्रस्त

माजलगाव दि.२४ (प्रतिनिधी):- माजलगाव - तेलगाव या राष्ट्रीय महामार्गावर अज्ञात व्यक्तींनी कारखान्याचे ऑईल मुद्दामहून सांडल्याचा आरोप प्रवाशातून होत असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघातांची मालिका घडली. रस्त्यावर सांडलेल्या ऑईलमुळे तब्बल २५ ते ३० दुचाकी घसरून अनेक दुचाकीस्वार जखमी झाले असून काहीजण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली असून रस्त्यावर ऑईलचा थर असल्यामुळे वाहनचालकांचे नियंत्रण सुटून एकामागोमाग एक दुचाकी घसरत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. नागरिकांच्या मते, हा प्रकार अपघाती नसून अज्ञातांकडून मुद्दाम ऑईल टाकण्यात आल्याचा संशय व्यक्त पान २ वर

### दोषींवर कठोर कारवाईची गरज इशारा फलक लावले असते तर अपघात टळले असते

ऑईलच्या थरामुळे माजलगाव तेलगाव रस्ता मृत्यूचा सापळा ठरला. २५ ते ३० दुचाकी घसरल्याने प्रशासनाच्या निष्काळजीपणा दिसून आला. मुद्दाम ऑईल टाकल्याचा संशय बळावत असल्याने दोषींवर कठोर कारवाईची गरज आहे. रस्त्यावर अचानक दुचाकी घसरत असल्याने नेमके काय घडते आहे हे समजलेच नाही. अनेकजण जखमी झाले, प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी. हा प्रकार अतिशय धोकादायक आहे. मुद्दाम ऑईल टाकले असल्यास दोषींना शोधून कठोर शिक्षा झाली पाहिजे.

## अंमळनेर हद्दीत विनापरवाना वाळू वाहतूक करणारा हायवा पकडला



पिंपळवंडी दि.२४(प्रतिनिधी) :- पाटोदा तहसीलचे तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांच्या मार्गदर्शनाखाली अंमळनेर महसूल मंडळाचे मंडळाधिकारी सुनील तांबारे व लिपिक सोमनाथ होळकर यांनी विनापरवाना वाळू वाहतूक करणारा हायवा पकडून अंमळनेर पोलीस ठाण्यात जप्त करून पुढील कार्यवाही करून संबंधित हायवा व वाळू जप्त केली.याविषयी पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की,दि.२३/०२/२०२६ सोमवार रोजी रात्री ११.३० वाजेच्या सुमारास माननीय तहसीलदार निलावाड साहेब, पान २ वर

# माझी आई नानी बाई वतीने आठ आदर्श माता पुरस्काराने सन्मानित

बीड दि.२४ (प्रतिनिधी):- शिवाजीनगर येथील सरस्वती विद्या मंदिर द्वारा संचालित स्वर्गीय वामन दादा पवार यांच्या स्मरणार्थ सालाबाद प्रमाणे याही वर्षी माझी आई नानी बाई आदर्श माता पुरस्कार व विविध स्पर्धा पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



सरस्वती विद्या मंदिराचे सचिव तथा ज्येष्ठ शिक्षक नेते श्री उत्तमराव पवार सर हे दरवर्षी आपले वडील स्वर्गीय वामन( दादा )पवार यांच्या स्मरणार्थ 'माझी आई नानी बाई, या नावाने आदर्श मातांना पुरस्कार व स्मृतिचिन्हे देऊन सन्मान चिन्ह सन्मानित करण्यात येते. यासोबत जिल्हास्तरीय रंगभरण निबंध लेखन सामान्य ज्ञान स्पर्धा इत्यादी स्पर्धेत विजयी स्पर्धकांना बक्षीसाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात येऊन विद्यार्थी शिक्षक पालक मेळावा ही घेण्यात आला. पुरस्काराचे हे दहावे वर्ष असून संस्थेचे सचिव व ज्येष्ठ शिक्षक नेते श्री उत्तमराव पवार सर , त्यांचे कुटुंबीय व विद्यालयाचे मुख्याध्यापक सह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी दहा वाजता शाळेच्या भव्य प्रांगणात असा सुंदर अविस्मरणीय पुरस्कार वितरण व बक्षीस वितरण चा कार्यक्रम घेण्यात आला होता. कार्यक्रमासाठी दादासाहेब मुंडे प्रदेश सरचिटणीस काँग्रेस कमिटी सह बीड नगर परिषदेचे उपाध्यक्ष विनोद मुळूक, नगरसेवक प्रमोद शिंदे नगरसेविका आरती रणजीत बनसोडे यांची उपस्थिती होती.

# मराठा आरक्षणात दिरंगाई

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी):- मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करून मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र तब्बल सहा महिन्यांनंतरही या संदर्भातील स्पष्ट कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळेच कुणबी प्रमाणपत्रांसाठी अर्ज कमी येत आहेत, अशी कबुली सरकारने २० फेब्रुवारी रोजी काढलेल्या आदेशातून दिली आहे. सरकारने मान्य केले आहे की, कार्यपद्धती निश्चित नसल्यामुळे अर्ज कमी प्रमाणात दाखल होत आहेत, तसेच प्रमाणपत्रांचे वाटपही अत्यल्प झाले आहे. या पार्श्वभूमीवर आता नवी समिती स्थापन करण्यात आली असून ही समिती आवश्यक कार्यपद्धती तयार करणार आहे.

# कंत्राटदारांचे तब्बल ७७ हजार कोटी थकले राज्य कंत्राटदार महासंघाचा आरोप

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी):- राज्य सरकारच्या तिजोरीत निर्माण झालेल्या खडखडाटामुळे कँत्राटदारांचे तब्बल ७७ हजार कोटी रुपयांचे देणे थकल्याचा गंभीर आरोप राज्य कँत्राटदार महासंघाने केला आहे. विशेष म्हणजे शासनाने दिलेले चेकही ट्रेझरीमध्ये वटत नसल्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झाली असून कँत्राटदारांनाही मोठे आर्थिक संकट आले असून त्वरित बिलाची रक्कम मिळाली नाही तर आंदोलनाचा इशारा कँत्राटदार संघटनेकडून देण्यात आला आहे.

सोमवारपासून राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. त्यात ६ मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचा अर्थसंकल्प मांडणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्याच्या तिजोरीत खडखडाट झाल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. राज्य कँत्राटदार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मिलिंद भोसले यांच्या मते, राज्यातील कँत्राटदारांचे तब्बल हजार कोटी रुपयांची बिले थकली आहेत. सरकारच्या काही विभागांनी थकबाकीचे चेक दिले आहेत. पण जेव्हा हे चेक बँकेत किंवा ट्रेझरीकडे नेले जातात, तेव्हा तिथे पैसे नसल्याचे सांगण्यात येते. हा कँत्राटदारांची थट्टा करण्याचाच प्रकार आहे.

९ तारखेच्या बैठकीत ठरणार आंदोलनाची दिशा निधीअभावी केवळ जुनी देयकेच रखडलेली नाहीत. तर सध्या सुरू असलेली विकासकामेही जागीच थांबली आहेत. नव्या कामांना मंजुरी देण्याचे प्रमाणही नगण्य आहे. या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी ९ मार्च रोजी राज्यातील शासकीय अभियंता व कँत्राटदारांची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा ठरवली जाणार आहे, असे भोसले यांनी सांगितले.

गत वर्षभरात १० टक्केच रक्कम अदा

उल्लेखनीय बाब म्हणजे पैशांचा तुटवडा निर्माण झाल्याचा फटका राज्यातील विकासकामांना बसत आहे. गतवर्षापर्यंत राज्यातील कँत्राटदारांची एकूण थकबाकी ८९ हजार कोटी रुपयांच्या घरात होती. त्यानंतर वर्षभरात सरकारने केवळ १० टक्के रक्कमच कँत्राटदारांना अदा केली. उर्वरित ७७ हजार कोटींसाठी आजही कँत्राटदार सरकारच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. यापैकी अनेकांनी आपल्या खिशातील पैसे टाकून ही कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. पण वेळेवर बिले मिळत नसल्यामुळे ते आर्थिक तंगीत सापडले. यामुळे काही जणांनी आत्महत्या केल्याच्याही घटना घडल्या.

सरकारला कँत्राटदारांचे बळी घ्यायचेत का ? : अंबादास दानवे

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार तथा विधान परिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या प्रकरणी सरकारवर टीका केली आहे. जनतेला आश्वासनांची गाजरे दाखवून झाली, आता कँत्राटदारांनाही चुना लावला जातोय ? तिजोरीत खडखडाट असताना दिलेले चेक म्हणजे केवळ रद्दीचे तुकडे ! शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी महाराष्ट्र आधीच होरपळतोय, आता सरकारला कँत्राटदारांचे बळी घ्यायचे आहेत का ? असा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

टेंडर कोणत्या आधारे काढले ? : सचिन अहिर

सचिन अहिर म्हणाले की, ७७ हजार कोटी रुपयांची बिले थकवण्यात आली आहेत. तर अनेक लोकांना आगाऊ चेक देण्यात आले आहेत ते वटलेले नाहीत, त्यांची तरतूद अधिवेशनात काही तरतूद करण्यात आलेली नाही. कँत्राटदारांना हजार कोटींची बिले अद्याप देण्यात आलेली नाहीत मग कोणत्या आधारावर टेंडर काढण्यात आले ? त्यामध्ये कुणाचा हिस्सा होता ? कुणी पैसे घेतलेले आहेत ? हे आम्ही विधानसभा आणि विधान परिषदेत मांडणार आहोत.

## यावर्षीचा उन्हाळा कडकच

बीड दि.२४ (प्रतिनिधी):- दरवर्षी महाराष्ट्रात तसा उन्हाळा कडकच असतो, परंतु यावर्षीचा उन्हाळा त्यापेक्षाही थोडा त्रासदायकअसू शकतो असा अंदाज हवामान खात्याने काढलाआहे. पाऊस जास्त झाल्यामुळे त्याच तुलनेत उन्हाळाही राहील असा तर्क आहे.

पान १ वरून

## हजारो ठेवीदारांचा मुंबईत ठिय्या

रास्तारोको, आदी आंदोलने केली. ठेवीदारांच्या रेट्यामुळे मल्टिस्टेटचे अध्यक्ष व संचालकांना अटक करण्यात आली. एमपीआयडी, ईडी अंतर्गत सर्व मालमत्ता जप्त करण्यात आल्या. मात्र लिलावाची प्रक्रिया रखडल्याने ठेवीदार हवालदिल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर जप्त मालमत्तेच्या लिलावाची तारीख तात्काळ जाहीर करावी, फॉरेन्सिक ऑडिट पूर्ण करावे, ईडीने जप्त केलेल्या मालमत्तेचा समावेश एमपीआयडी कायद्यात करावा तसेच सहकार क्षेत्रात काम केलेल्या नामवंत वकील तसेच अॅड. उज्ज्वल निकम यांची शासनाने विशेष वकील म्हणून नियुक्ती करावी, अशा प्रमुख मागण्या आंदोलकांनी मांडल्या. प्रा. उबाळे यांनी गेल्या महिनाभरात मराठवाड्यात शाखानिहाय बैठका घेत मोर्चासाठी जनजागृती केली होती. आंदोलनात ठेवीदारांसह ज्येष्ठ नेत्या प्रा.सुशिलाताई मोराळे, शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले, भागवत तावरे, जिल्हा परिषद सदस्य गणपत डोईफोडे, प्रा.सनी वाघमारे, आदी उपस्थित होते.

## ८ दिवसात सर्व विभागांची बैठक घेऊ

गतीमान करून गरीब ठेवीदारांचे पैसे परत मिळवण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्नशील राहू, असे आश्वासनही त्यांनी दिले.

## एसटीच्या सवलत कार्डसाठी २२० रुपये

आर्थिक लूट होऊ लागली आहे. बीडमध्ये गोरे नावाचा कोणीतरी एजंट आहे तो १९९ ऐवजी २२० रुपये घेत आहे. आगाऊ २० रुपयांची रक्कम घेण्याचा अधिकार त्यांना बीडचा विभाग नियंत्रकांनी दिला आहे की काय ? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. या प्रश्नी विभाग नियंत्रकांनी तात्काळ खुलासा करुन एजंटांनी एका सवलत कार्डसाठी १९९ रुपयेच घ्यावेत अशा सूचना द्याव्यात, जे एजंट जास्तीचे पैसे घेतील ते नक्कीच एसीबीमध्ये अडकतील.

## बीडीओ सानप यांनी पाठविलेली चौकशी समिती पोहोचलीच नाही...

५ अधिकाऱ्यांची समिती गावात जाऊन चौकशी करणार होती, समिती येणार म्हणून तक्रारदार शिवाजी कवचट, दत्तात्रय कवचट यांच्यासह त्यांचे सहकारी सकाळपासूनच कार्यालयीन वेळेपर्यंत अधिकाऱ्यांची वाट पाहत बसले होते. मात्र दिवस गेला तरीही ५ अधिकाऱ्यांची चौकशी समिती गावात आली नाही, त्यावर कवचट यांनी विविध अधिकाऱ्यांना फोनवरुन संपर्क करुन माहिती घेतली असता तेथील सरपंचाने कोणत्यातरी एका डॉक्टराची अपॉइंटमेंट घेतल्याचे पत्र पंचायत समितीत दिले होते त्यामुळे दि. २४ रोजी समिती गेली नाही. वास्तविक पाहता चौकशी समितीच्या दौऱ्यात अचानक बदल करता येत नाही, केलाच तर संबंधीत तक्रारदारांना त्याची माहिती देणे बंधनकारक असते, मात्र बीडीओ सानप यांनी या बाबतची कसलीच माहिती तक्रारदारांना दिली नाही, दरम्यान सरपंचांना नेमक्या चौकशी समिती येणार त्याच दिवशी डॉक्टरांची अपॉइंटमेंट का घ्यावी वाटली ? सरपंचांनी पत्र दिले आणि बीडीओंनी ते मान्य कसे केले असे अनेक प्रश्न कवचट यांनी उपस्थित केले आहेत. गटविकास अधिकाऱ्यांना भ्रष्टाचार लपविण्याची अशी अफलातून आयडिया कशी सूचते असा सवाल देखील शिवाजी कवचट आणि दत्तात्रय कवचट यांनी पत्रकातून विचारला आहे.

## बीडमध्ये वकिलास मारहाण...

बीड येथील जिल्हा वकील संघाचे सदस्य अॅड.राम पांडुरंग डोंगरे हे न्यायालय परिसरात वकील व नोटरी म्हणून काम करतात. मंगळवार दि. २४ फेब्रुवारी रोजी राधाकिसन रामचंद्र करपे यांनी त्यांच्या टेबलला लागून मोटारसायकल उभी केली होती. तेंव्हा अॅड.डोंगरे यांनी मोटारसायकल बाजुला लावा असे म्हणताच करपे यांनी अरेरावी करुन शिवीगाळ केली. त्यानंतर १० ते १५ मिनीटांनी करपे पुन्हा त्यांच्यासोबत ३ महिला व अन्य दोन पुरुषांना घेऊन आले व डोंगरे यांना मारहाण केली. जीवे मारण्याची धमकी देऊन अॅट्रॉसीटी व विनयभंगाची केस करु अशी धमकी देखील दिली. सदरील घटनेने न्यायालयाच्या आवारात एकच खळबळ उडाली होती. सर्व वकील बांधवांनी तात्काळ शिवाजी नगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन सर्व आरोपींवर गुन्हे दाखल करुन त्यांना तात्काळ अटक करा अशी मागणीही केली.

## निष्पाप सोहम डरफेंची मृत्युशी झूंज

परंतु दुसऱ्या दिवशी संबंधित डॉक्टरांनी सदर रूग्ण गंभीर आहे त्यांना दुसरीकडे हलवल्याबाबत सांगितले, सध्या निष्पाप सोहन डरफे यांना सिग्मा हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर येथे उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते, ते सध्या मृत्यूशी झुंज देत आहेत, अद्याप प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली नाही, तरी सिंदफणा नदी पात्रातील अवैध वाळू उपसा बंद करून संबंधितांवर कठोर शासन व्हावे ही कुटुंबीयांकडून मागणी होत आहे.

## बिल्डींग मालकाच्या पायऱ्या वाचविण्यासाठी नाला वळविला

त्यामुळे ६० फुटाचा रस्ता देखील कमी होऊ लागला असून एका सरळ रेषेत काम आलेले नाही, या प्रकारामुळे या भागातील नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होऊ लागला आहे. धांडे नगरच्या कमानीपासून २०० फुटावर एका बिल्डींगसमोर हा नाला वळविण्यात आला आहे. बिल्डींगच्या पायऱ्या व काही भाग रोडवर आलेला आहे हे सरळ सरळ दिसते. संबंधीत बिल्डींग मालकाकडे पाण्याच्या जारचा प्लॅन्ट आहे. त्या ठिकाणी येणारे ग्राहक पाणी देण्यासाठी रहदारीच्या रोडवर गाड्या उभा करतात, यामुळे अनेकदा ट्रॅफीक देखील जॅम होते. अशा तक्रारी नागरिकांमधून होत आहे. जे योग्य आहे त्याच पद्धतीने नाला आणि रोडचे काम होणे आवश्यक आहे. एखाद्या बिल्डींगला वाचविण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरणे कितपत योग्य आहे. नगर पालिकेने नियमानुसार काम करावे, त्या बिल्डींग मालकाकडे बिल्डींग परवाना, लेआऊट या सर्व गोष्टी पूर्ण आहेत का ? हे देखील तपासले पाहिजे. केवळ बिल्डींगच्या पायऱ्या वाचविण्यासाठी एवढा मोठा रस्ता छोटा करायचा हे कितपत योग्य आहे ? या संदर्भात नगर पालिकेचे मुख्याधिकारी आणि संबंधीत गुत्तेदाराने देखील विचार करावा अशी मागणी या भागातील नागरिकांकडून होऊ लागली आहे.

## फरार प्रदीप फाटे अजुनही सापडेना...

**श्यामल नारायण जाधवर यांनी दि.२४ फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षकांना उपोषणाबाबतचे निवेदन दिले आहे. आज दि.२५ पासून हे कुटुंब एस.पी.ऑफीस समोर उपोषण करत आहे.**

## माजलगाव-तेलगाव रोडवर ऑईल सांडले

केला जात आहे. त्यामुळे या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच तातडीने रस्ता स्वच्छ करून वाहतूक सुरक्षित करावी अशी मागणी होत आहे.

दरम्यान, वारंवार घडणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी तीव्र मागणी करण्यात येत आहे. दरम्यान दि. २३ फेब्रुवारीला शहरासह तालुका परिसरात अवकाळी पाउस झाल्याने हे ऑईल पुन्हा - पुन्हा तेलकट झाले होते. त्यामुळे सकाळपासुन ते सायंकाळी पाच ते सहा पर्यंत दुचाकी घसरण्याच्या घटना सुरूच होत्या.

## अंमळनेर हद्दीत विनापरवाना वाळू वाहतुक करणारा हायवा पकडला

मंडळ अधिकारी सुनील तांबारे तसेच सोमनाथ होळकर अंमळनेर ठाण्याचे सहाय्यक फौजदार परशुराम मंजुळे व पोलीस कॉन्स्टेबल योगेश बहिरवाळ हे अंमळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालित असताना साबळेवाडी फाटा अंमळनेर येथे आले असताना त्यांना समोरून एक पिवळ्या रंगाचा विना नंबरचा भारत बेंझ कँपनीचा हायवा टिप्पर भडकेल कडून अंमळनेरकडे येत असताना दिसला. त्यांना हायवा सबंधी संशय आल्याने त्यांनी हायवास हात दाखवून हायवा थांबवून चालकास चौकशी केली व सदरील हायवाची पाहणी केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना रॉयल्टी नसल्याचे आढळून आले.विनापरवाना ६ ब्रास वाळू दिसून आली.तहसीलदार डी.बी.निलावाड,मंडळाधिकारी तांबारे व होळकर यांनी स्पॉट पंचनामा करून हायवासह चालक कुंडलिक विष्णू काकडे रा.तोंडोळी ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर यांच्यावर दोन पंचा समक्ष कार्यवाही करून अंमळनेर पोलीस ठाण्यात हायवा आणून जप्त केला.कलम १८५ बीएनएनएस प्रमाणे माल जप्ती अन्वय पंचनामा केला.तसेच त्यांच्याविरुद्ध कलम ३०३(२) भारतीय न्यायसंहितासह कलम ४-२१ खाण व खनिज अधिनियम १९५७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास स.पो.निरीक्षक भार्गव सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून पाटोदा तहसीलच्या धडाकेबाज कार्यवाहीमुळे परिसरातील अवैध वाळू तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून या धडाकेबाज कार्यवाहीचे परिसरात स्वागत होत आहे.


# जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळवण्यात येते की, आमचे अशील नामे **सुभाष पि.बाबुराव ढेरे, वय-४६ वर्षे, धंदा-शेती, रा. रामनगर, ता. जि.बीड** यांनी दिलेल्या माहिती, सुचना व अधिकारावरुन आम जनतेस कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी त्यांचे वडील व भाऊ नामे **बाबुराव पि.तात्याबा ढेरे, गणेश पि. बाबुराव ढेरे, अनुरथ पि. बाबुराव ढेरे, बाळू पि.बाबुराव ढेरे, रा.सर्व रामनगर ता.जि. बीड** यांचे विरुद्ध विशेष दिवाणी दावा क्र. २१०/२०२५ सुभाष विरुद्ध शासन व ईतर असा वाटप करून स्वतंत्र ताबा मिळणे संबंधी तसेच संपादित मिळकतीतील मोबदल्याची रक्कम आमचे पक्षकारास त्याच्या हिस्स्यानुसार मिळणे संबंधी व गणेश ढेरे व अनुरथ ढेरे यांचे हक्कात त्यांचे वडिलांनी लिहून दिलेले खरेदीखत क्र.५६६२ दि. २८/०९/२०१० आमचे पक्षकाराचे हक्कावर बंधनकारक नसल्याचे जाहीर करणे संबंधी व निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दिलेला आहे सदरील दावा हा प्रलंबित आहे. सदरील दाव्यातील वाद मिळकत हि खालील प्रमाणे आहे.

अ)

| अनु क्र. | गट क्र. | क्षेत्रफळ | आकार | पैकी वादग्रस्त हे. आर | ठीकाण |
|---|---|---|---|---|---|
| १) | १६४ | ०.६५.०० | २.४८ | ०.१६.६७ | शिदोड |
| २) | १६५ | ७.४४.०० | ३०.८६ | ०.४३.०० | शिदोड |
| ३) | १७१ | ८.७३.०० | २.१९ | ०.४०.०० | घोसापुरी |
| ४) | २४७ | ९.०८.०० | १५.४३ | २.५१ | कामखेडा |
| ५) | ६१ | ३०.३४.०० | ६६.९७ | ०.०१.११ | घोसापुरी |

ब) ग्रामपंचायत जिरेवाडी ता.जि.बीड येथील राहते घर क्र.१२ ज्याची लांबी: दक्षिणोत्तर ५३ फुट व रुंदी पू.प. २९ फुट अशी असून त्यात ७५० चौ. फुटाचे आर.सी.सी. बांधकाम आहे व ७८७ चौ. फुट खुली जागा आहे.

वरील मिळकत हि आमचे पक्षकाराची एकत्रित कुटुंबाची जमीन आहे. तरी वरील वर्णनाची मिळकत हि वरील वर नमूद व्यक्ती यांचे कडून उपरोक्त वादग्रस्त मिळकत कोणीही खरेदीखत, बक्षीसपत्र, आममुख्त्यारपत्र, वारस हक्क, वाटणीपत्र, गहाणखत, इसारपावती असा कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार करु नये, केल्यास सदरचा व्यवहार आमचे पक्षकाराचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही.

करीता हे जाहीर प्रगटण.

दि.२४/०२/२०२६

- जाहीर प्रगटन देणार -

**सुभाष पि.बाबुराव ढेरे**

- मार्फत -

**विठ्ठल बी. शेळके (अॅडव्होकेट)**

जिल्हा व सत्र न्यायालय बीड ता. जि. बीड,४३११२२

मो.९८९०३८१९९३

16566-13456


पान ६ वरून

## २४ महिन्यात संपादन न केल्यास...

महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना कायदा, १९६६ च्या कलम १२६ आणि १२७ अंतर्गत विचारात घेतल्यानुसार जर जमिनीच्या संपादनासाठी कोणतीही ठोस पावले उचलली नाही आणि वैधानिक कालावधी संपला तर मग संबंधित जमिनीवरील आरक्षण आपोआप रद्द होते. त्यानंतर खरेदी नोटिशीतील कथित दोषांबाबत घेतलेले तांत्रिक आक्षेप ग्राह्य धरले जाऊ शकत नाहीत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

खरेदी नोटीस बजावल्यानंतर कलम १२७(१) अंतर्गत २४ महिन्यांच्या निर्धारित कालावधीत जमीन संपादित केली नाही किंवा संपादनासाठी पावले उचलली नाहीत, तर जमिनीवरील आरक्षण रद्द होत असल्याचे न्यायालयाने म्हटले. गिरनार ट्रेडर्स विरुद्ध महाराष्ट्र सरकार आणि निर्मिती डेव्हलपर्स विरुद्ध महाराष्ट्र सरकार या प्रकरणांत सर्वोच्च न्यायालयाने आखून दिलेल्या तत्त्वांचा हवाला देत उच्च न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

## स्मशानभूमी व याकडे जाणाऱ्या बोगस रस्त्याची चौकशी करण्यात यावी-शेख तौफिक

कसलाही विलंब करता कामा नये, याची दक्षता घेण्यात यावी नसता लवकरच तोफिक अकबर शेख यांनी येथील ग्रामपंचायतीसमोर चौकशी न झाल्यास उपोषणाचा इशारा निवेदनातून देण्यात आलेला आहे. तरी या स्मशानभूमी व याकडे जाणाऱ्या बोगस रस्त्याची चौकशी व पहाणी करावी, याची वरिष्ठ विभागाने गंभीर दखल घ्यावी, असे निवेदनातून म्हटले आहे.

## जि.प.तळवट बोरगावच्या विद्यार्थ्यांची वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

राष्ट्र उभारणीत योगदान देऊ शकतील असे व्यासपीठ तयार करण्यासाठी कार्यरत आहे. अशा या राष्ट्रविद्या गीत संस्थेने राष्ट्रीय स्तरावरील देशभक्तीपर उपक्रम भारताच्या व्या प्रजासत्ताक दिनी म्हणजे २६ जानेवारी २०२६ निमित्ताने एकाच ऑनलाइन व्यासपीठावर भारतातील सर्वाधिक विद्यार्थ्यांना एकत्रित करून सामूहिक भारतीय राष्ट्रगीत गायन हा उपक्रम आयोजित केला होता. या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमामध्ये भारतभरातील एलकेजी ते पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या भारतातील विविध शाळेतील सुमारे १,८२,५२९ विद्यार्थ्यांनी दि. २४ जानेवारी २०२६ ते २१ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत व्हर्च्युअली सहभाग घेतला होता. भारताच्या व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय स्तरावर आयोजित केलेल्या राष्ट्रगीत गायन उपक्रमात गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव शाळेतील राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा शाळेचे मुख्याध्यापक शशिकांत कुलथे यांच्या संकल्पनेतून तसेच शाळेतील शिक्षक धर्मेंद्र गोरे आणि शिक्षिका राधिका अंबिलवादे यांच्या सहकार्यातून शाळेतील इ १ ली ते ४थी वर्गात प्रविष्ट असणाऱ्या एकूण ४९ विद्यार्थी आणि शाळेतील ३ शिक्षक अशा एकूण ५२ जणांनी व्हर्च्युअली सहभाग घेत राष्ट्रगीत गायन केले. त्यांच्या या उपक्रमाची आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद घेण्यात आलेली आहे. त्याबाबतचे प्रमाणपत्र सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शाळेला नुकतेच त्या संस्थेद्वारे प्रदान करण्यात आलेले आहे. सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होणारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव ही महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा परिषदेची शाळा ठरली आहे. जिल्हा परिषद शाळा तळवट बोरगाव यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमामुळे मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये देशभक्ती, सांस्कृतिक जागरूकता, राष्ट्रीय एकता, सामूहिक सहभाग यांची वाढ होऊन सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये शाळेची नोंद झाल्यामुळे शाळेचा बहुमान उंचावला आहे. महाराष्ट्रातली एकमेव जि. प. शाळा..

आंतरराष्ट्रीय स्तरावरील आयोजित राष्ट्रगीत गायन स्पर्धेत व्हर्च्युअली सहभागी होऊन सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांची नोंद होणारी गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद तळवट बोरगाव ही शाळा महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा परिषदेची शाळा ठरलेली आहे. अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्रप्रेम, विविधतेत एकता अशा गुणांचा विकास होण्यास मदत होते.

## स्वच्छता हीच सेवा हा संत गाडगे महाराजांचा संदेश आजही प्रेरणादायी

अंधश्रद्धा, जातिभेद, व्यसनाधीनता आणि वाईट रूढी-परंपरांविरुद्ध कठोर भूमिका घेतली. दीन-दुबळ्यांच्या सेवेला प्राधान्य देत त्यांनी धर्मशाळा, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे तसेच शिक्षणासाठी विविध उपक्रम राबवले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचावी, ही त्यांची भूमिका होती.गाडगे महाराजांचे जीवन अत्यंत साधे, परंतु विचार अत्यंत उंच होते. कृतीतून समाजाला संदेश देत त्यांनी खरी भक्ती ही समाजसेवेत असल्याचे अधोरेखित केले. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचा आदर्श घेत स्वच्छता, शिक्षण आणि सामाजिक समता या मूल्यांसाठी कार्य करणे, हीच त्यांना खरी अभिवादनाची भावना ठरेल, असेही डॉ.क्षीरसागर यांनी नमूद केले.याप्रसंगी नगरसेवक शुभम धुत, मंगेश धोंगडे, राजाभाऊ पिंगळे, अशोक तांबारे, अमोल पौळ, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, विठ्ठल गुजर, शुभम कातांगळे, प्रा. रवी शिंदे, विकास यादव, शारदाताई डुलगज तसेच प्रशांत पवार, मोहन राऊत, विक्रम वाघमारे, रमेश घोडके, सुशांत राऊत यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जि.प.कें.प्रा.शाळा कडा नंबर एक या शाळेचे

अध्यक्ष योगेश कर्डिले. उपाध्यक्ष सौ नमिता दिपक कर्डिले , सर्व सदस्य. मुख्याध्यापक उद्धव सोनवणे यांनी विभाग प्रमुख नितीन करडूळे मार्गदर्शक शिक्षक श्रीमती शोभा सातव मॅडम,संजय लांडे सर यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

**'एकात्म मानवदर्शन'म्हणजे शाश्वत विकासाचा मार्ग-डॉ.उपेंद्र कुलकर्णी**

## भारत टी २० वर्ल्ड कपच्या उपांत्य फेरीत कसा पोहोचणार ?

सामन्यात जरी भारताचा पराभव झाला तर स्पर्धेतील आव्हान संपुष्टात येईल. आतापर्यंत ग्रुप १ मधील दोन सामने झाले आहेत. दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांनी प्रत्येकी एका सामन्यात विजय मिळवला आहे. भारत आणि झिम्बाब्वेचा पराभव झाला आहे.

पहिलं समीकरण

टीम इंडिया टी २० वर्ल्ड कपवर आपल्या बळावर पोहोचू शकते. त्यासाठी दक्षिण आफ्रिकेनं राहिलेले दोन्ही सामने जिंकावे लागतील. म्हणजे त्यांचे सुपर ८ मधील गुण ६ होतील. यानंतर भारतानं राहिलेले दोन्ही सामने जिंकावेत यात भारताचे गुण ४ होतील. या स्थितीत नेट रनरेटचा मुद्दा येणार नाही. दक्षिण आफ्रिका ६ गुणांसह आणि भारत ४ गुणांसह उपांत्य फेरीत पोहोचू शकतात. वेस्ट इंडिजकडे २ गुण असतील आणि झिम्बाब्वेनं सर्व सामने गमावल्यानं त्यांच्या खात्यात एकही गुण नसेल, अशी स्थिती झाल्यास भारत उपांत्य फेरीत पोहोचू शकतो.

दुसरं समीकरण

दुसऱ्या समीकरणाचा विचार केला असता दक्षिण आफ्रिकेचा वेस्ट इंडिज विरुद्ध पराभव झाल्यास आणि भारतानं राहिलेल्या दोन मॅच जिंकल्यास आणि दक्षिण आफ्रिकेनं झिम्बाब्वेला पराभूत केल्यास नवं चित्र निर्माण होईल. भारत, दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज यांचे ४-४ गुण असतील. यावेळी उपांत्य फेरीत नेट रनरेटचा मुद्दा विचारात घ्यावा लागेल. सुपर ८ मधील शेवटचा सामना भारताचा असल्यानं त्यात नेट रनरेट सुधारण्याची संधी भारताकडे असेल.

तिसरं समीकरण

दक्षिण आफ्रिकेचा वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वेकडून पराभव झाल्या, त्यांच्याकडे २ गुण राहतील. या स्थितीत भारत दोन्ही सामने जिंकून ४ मिळवू शकतो. भारत आणि वेस्ट इंडिज ४-४ गुणांसह सुपर ८ मध्ये पोहोचू शकतो. दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वेकडे २-२ गुण राहू शकतात.

## चंद्रभागा उत्तम गवळी यांचे निधन

त्यांची प्राणज्योत मावळे सायंकाळी त्यांच्यावर खालापूरी येथील स्मशानभूमी मोठ्या शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात पती एक मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार असून पत्रकार अशोक गवळी यांच्या त्या चुलती होत्या. गवळी परिवाराच्या दुःखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## लाईट संदर्भात तुतारी गटाने घेतली मुख्य अभियंताची भेट

आहे त्यामुळे सुद्धा जिवितहानी होण्याची शक्यता आहे तर अनेक ठिकाणी विद्युत पोल नसल्यामुळे लोकांना पाच पाचशे फुटांवरून विद्युत मिटर घ्यावे लागत आहेत, लोकसंख्या अनुसार डि.पी.नसल्याने व्होल्टेज कमी जास्त होऊन इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू जळुन जाते, अनेक वर्षांपासून ची विद्युत तारे कधी तुटून अंगावर पडेल याचा नेम नाही अश्या विविध तक्रारी घेऊन आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार गटाचे गटनेते खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने म.वि.वि.कं. चे मुख्य अभियंता यांची भेट घेतली, म.वि.वि.चे मुख्य अभियंता यांनी वरील समस्या संदर्भात विशेष लक्ष देऊन कामे मार्गी लागेल असे आश्वासन दिले आहे, यावेळी गटनेते नगरसेवक खुर्शीद आलम, नगरसेवक भारत कांबळे, नगरसेवक अथहर भाई, नगरसेवक जाधव साहेब, नगरसेवक अय्युब खान, नगरसेवक शेख अफसर, नगरसेवक मसुद खान, नगरसेवक रईस भाई, नगरसेवक मसी मोमीन, नगरसेवक उल्हास ग्राम, नगरसेवक पिंगळे , नगरसेवक काळे, आ.संदिप भैय्या क्षीरसागर यांचे पी.ए. चौरे उपस्थित होते.

## मुस्लिम समाजाच्या ५ टक्के आरक्षणासाठी सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठान आक्रमक

नंतर हा निर्णय रद्द करण्यात आला. या निर्णयामुळे समाजातील मागास, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व शैक्षणिकदृष्ट्या मागे असलेल्या घटकांवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त करत सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठानने तीव्र नाराजी दर्शवली आहे. प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मुस्लिम समाजातील मोठा वर्ग आजही शिक्षण, रोजगार आणि शासकीय योजनांपासून वंचित आहे. अशा परिस्थितीत आरक्षण रद्द करणे म्हणजे सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना छेद देणारे पाऊल आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ पुनर्विचार करून मुस्लिम समाजाचे ५ टक्के आरक्षण पुन्हा लागू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सातही जिल्ह्यांत निवेदन देताना प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी शांततेच्या मार्गाने आंदोलन करत शासनाचे लक्ष वेधले. आरक्षण हा आमचा हक्क आहे, दान नव्हे, अशी भूमिका मांडत त्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचा अभ्यास करून न्याय्य निर्णय घ्यावा, असे आवाहन केले. प्रतिष्ठानने इशारा दिला आहे की, शासनाने या मागणीची दखल घेतली नाही तर येत्या काळात राज्यव्यापी जनआंदोलन उभारले जाईल. समाजातील सर्व घटकांना एकत्र करून लोकशाही मार्गाने लढा उभारण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या निवेदनामुळे पुन्हा एकदा राज्यातील मुस्लिम समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आला असून शासनाची पुढील भूमिका काय राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ पान -३


## सात वर्षीय मुस्कानचा पहिला रोजा पुर्ण



कडा दि २४ (प्रतिनिधी) -पवित्र रमजान महिन्यात लहान मुलांमध्येही उपवास करण्याची मोठी जिद्द पाहायला मिळत आहे. आष्टी तालुक्यातील ऊंदरखेल येथील ७ वर्षीय मुस्कान सिराज शेख हिने तिच्या आयुष्यातील पहिला रविवार २२ फेब्रुवारी रोजी पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. वयाने लहान असूनही, पहाटेच्या सहरी पासून ते सायंकाळच्या इफ्तार पर्यंत अन्नाचा कण आणि पाण्याचा थेंबही न घेता आपला हा पहिला रोजा तिने पूर्ण केला. मुस्कान ने रोजा धरल्यामुळे शेख कुटुंबात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. तिचे वडील सिराज शेख आणि कुटुंबीयांनी मुस्कान चे विशेष कौतुक केले. तसेच नातेवाईक आणि मित्र परिवाराकडून मुस्कानवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## साबला येथे राष्ट्रसंत गाडगेबाबांची जयंती साजरी



केज दि २४ (प्रतिनिधी)- शहरापासून जवळच असलेल्या व तालुक्यातील साबला येथे कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी उपस्थित चेअरमन उत्तम काकडे, लक्ष्मण महाराज काकडे, माजी उपसरपंच अभिमान नाईकनवरे, दत्तकुमार काकडे, नरहरी काकडे, आत्मारामकाकडे, गुलाब मुळे, संतोष नाईकनवरे, सुरेश शिंदे, राजेभाऊ काकडे, महादेव काकडे, आदर्श शिक्षक सोनाजी काकडे, भागवत काकडे, शिवाजी काकडे, ज्ञानेश्वर काकडे, रामदास मुळे, पिंटु नाईकनवरे, विकास नाईकनवरे, बंडु नाईकनवरे, अंकुश काकडे, महादेव नाईकनवरे, पांडुरंग काकडे, रंगनाथ नाईकनवरे साबला नगरीतील ईत्यादी नागरिकांच्या उपस्थितीत कर्मयोगी, राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

# फुलेपिंपळगाव ग्रामपंचायतीमध्ये २ कोटी रूपयाचा अपहार झाल्याचा आरोप करून चौकशीची मागणी

## शेख जुनेद नसीर यांची राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे तक्रार

माजलगाव दि २४ (प्रतिनिधी)- तालुक्यातील फुलेपिंपळगाव ग्रामपंचायतीमध्ये सुमारे दोन कोटी रुपयांच्या आर्थिक अनियमिततेचा गंभीर आरोप समोर आला आहे. गावातील रहिवासी शेख जुनेद नसीर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यसचिव यांच्याकडे लेखी तक्रार सादर करून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. संबंधित तक्रारीत ग्रामपंचायतीच्या जनरल खाते क्र.६२२२२३४००३७ मधून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत रक्कम काढण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. फुलेपिंपळगाव हे औद्योगिक व व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे गाव मानले जाते. गावाच्या हद्दीत सुमारे ४०० एकर एमआयडीसी क्षेत्र, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिनिंग उद्योग, शैक्षणिक संस्था तसेच विविध कारखाने व कंपन्या कार्यरत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या तिजोरीत दरवर्षी मोठ्या प्रमाणावर महसूल जमा होत असल्याचे सांगितले जाते. अशा परिस्थितीत निधीचा पारदर्शक वापर अपेक्षित असताना मोठ्या आर्थिक व्यवहारांबाबत संशय निर्माण झाल्याने गावात चर्चेला उधाण आले आहे.तक्रारीनुसार, दि. १ फेब्रुवारी २०२२ ते दि. १ डिसेंबर २०२५ या कालावधीत ग्रामपंचायतीच्या बचत खात्यातून तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या निधी खात्यातून अंदाजे २ कोटी रुपये काढण्यात आले. हे व्यवहार आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मान्यता न घेता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. नियमानुसार कोणत्याही विकासकामासाठी अंदाजपत्रक मंजुरी, तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया, कार्यारंभ आदेश तसेच मोजमाप पुस्तके तयार करणे बंधनकारक असते. मात्र या प्रक्रियांचे पालन झाले नसल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.ग्रामपंचायतीच्या एसबीआय बँक स्टेटमेंटचा दाखला देत काही विशिष्ट व्यवहारांचा उल्लेख करण्यात आला आहे. दि. १ जून २०२२ रोजी ९ लाख ९० हजार रुपये काढण्यात आल्याचे तसेच दि. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी ७५ हजार रुपयांचा धनादेश बिल्डिंग मटेरियलसाठी देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. अशा प्रकारचे अनेक व्यवहार झाल्याने कोट्यवधी रुपयांच्या अपहाराचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणाबाबत पंचायत समिती माजलगाव येथील गटविकास अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आला असल्याचेही तक्रारीत नमूद आहे. चौकशी समिती नेमण्याचे तोंडी आश्वासन मिळूनही चार महिन्यांनंतरही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, संबंधित प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून दोषींवर प्रशासकीय तसेच फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा मंत्रालय, मुंबई येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आरोपांमुळे फुलेपिंपळगाव परिसरात खळबळ उडाली असून, प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संत गाडगेबाबा हे मानवतावादी संत होते -डॉ.हनुमंत सौदागर

अंबाजोगाई दि २४ (प्रतिनिधी)- कर्मयोगी संत गाडगेबाबा यांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत. विचारातून कृतिशीलता जपावी असे मत डॉ. हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले .

केज शहरातील भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयात संत गाडगे महाराज जयंती निमित्त कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी प्रा. बलाढये यु.बी.,प्रा.कचरे जे.एस,प्रा.लुंगारे एस. आर,प्रा.जगदाळे एम. एच,प्रा.चोले एन.जे ग्रंथपाल संतोष साळवी सुजीत नाईकवाडे यांची प्रमुख होती.यावेळी बोलतांना डॉ.हनुमंत सौदागर सर म्हणाले की,संत गाडगे बाबा हे मानवतावादी संत होते जीवन भरात सेवेचा वसा घेऊन दिवसभर गावातील घाण साफ करून रात्री लोकांच्या डोक्यातील अंधश्रद्धेची घाण साफ करण्याचे कार्य त्यांनी केले.समाजसेवा सर्वश्रेष्ठ असल्याचा विचार त्यांनी दिला.त्यांच्या विचारातून देश घडत आहे.असे मत व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी अरविंद गायसमुद्रे,सतीश नेहरकर,यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे-प्राचार्य पठाण

पाटोदा दि २४ (प्रतिनिधी )- दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेत जिल्हाधिकाऱ्यांच्या कापीमुक्त परीक्षा घेण्याची तंत्र उल्लेखनीय असून या तंत्रामुळे जिल्ह्यात काफीमुक्त परीक्षा होत आहे ही बाब अभिनंदन असून विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासाकडे पूर्ण लक्ष केंद्रित करावेत व येणाऱ्या परीक्षेत सामोरे जावे असे आवाहन लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूलचे प्राचार्य नजीर पठाण यांनी विद्यार्थी शिक्षक पालक मेळाव्यात बोलताना केले

पाटोदा येथील लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल मध्ये नुकतीच पालक- शिक्षक आणि विद्यार्थ्यांची वार्षिक शैक्षणिक बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य पठाण सर होतेयावेळी पालकांना मार्गदर्शन शाळेचे ज्येष्ठ शिक्षक सावंत सर, वसुंधरा मॅडम गणिताचे प्रमुख कांतिलाल घोलप यांनी आपल्या मार्गदर्शन बोलताना सांगितले की सर्वच विद्यार्थ्यांनी वर्षभर शाळेला उपस्थिती दर्शविली पाहिजे . विज्ञान गणित आणि इंग्लिश या विषयांचा अभ्यास सतत करावा लागतो आणि भाषा विषयाचा पूर्ण अभ्यास केल्यानेच विद्यार्थी गुणवत्ता यादीत येत असतात कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सीमा मिस शाहिद सर कृष्णा सानप अर्जुन सानप सावंत सर आदींनी मोठे परिश्रम घेतले. यावेळी पालकांचे आभार सावंत सर यांनी मानले.

# शेतकऱ्यांची सरसकट संपूर्ण कर्जमाफी करा- नुमान चाऊस



माजलगाव दि.२४( प्रतिनिधी)- राज्यातील शेतकरी सध्या गंभीर आर्थिक संकटात सापडलेला असून वाढती महागाई, नापिकी, नैसर्गिक आपत्ती आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे शेतकऱ्यांचे जीवन अक्षरशः उद्ध्वस्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने चालू अधिवेशनातच शेतकऱ्यांच्या सरसकट संपूर्ण कर्जमाफीची तात्काळ घोषणा करावी आणि दिवंगत नेते अजित दादा पवार यांचे शेतकरीहिताचे स्वप्न पूर्ण करावे, अशी ठाम मागणी मौलाना आझाद युवा मंचचे बीड जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे.

नुमान चाऊस म्हणाले की, अजितदादा पवार यांनी नेहमीच शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. शेतकऱ्यांना दिलासा देणारे धाडसी आणि निर्णयक्षम नेतृत्व ही त्यांची ओळख होती. आज शेतकरी हतबल अवस्थेत असताना, त्यांच्या विचारांना आणि कार्याला खरी श्रद्धांजली द्यायची असेल तर शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी जाहीर करणे हाच योग्य मार्ग आहे.पुढे म्हणाले की, कर्जबाजारीपणामुळे शेतकरी तीव्र मानसिक तणावाखाली असून आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत आहे. ही स्थिती रोखण्यासाठी केवळ आश्वासनांवर न थांबता ठोस व तातडीचे निर्णय घेणे आवश्यक आहे. चालू अधिवेशनात कर्जमाफीची घोषणा झाल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल आणि सरकारबद्दलचा विश्वास अधिक दृढ होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## सांप्रदाय ही महान गंगा असून परमार्थ करतांना आपला हेतू शुद्ध ठेवा-ह.भ.प. विठ्ठल महाराज



डोंगरकिन्ही दि २४ (प्रतिनिधी)- प्रत्येक जीवांसाठी सांप्रदाय ही महान गंगा आहे,या गंगेमध्ये आनंदाने भक्ती रुपी भाविकांनी स्नान करून आत्म्याचा उध्दार करुन घ्यावा. परमार्थ करताना निष्काम भावना व हेतू शुद्ध ठेवा , सांप्रदायाचे विडंबन होणार नाही याची जबाबदारी सर्वांचीच आहे. आत्मा आहे तोवर अध्यात्म आहे .भक्ती रसामध्ये प्रत्येकांनी आपल्या आत्म्याचा उध्दार करुन घ्यावा. असे विचार ह.भ.प.विठठल महाराज गहीणीनाथ गड यांनी केले. पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथे संत वामनभाऊ महाराज मंदिर प्रतिष्ठानच्या वतीने २९ व्या अखंड हरिनाम सप्ताहात काल्याचे किर्तन प्रसंगी संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर भाविकांना उपदेश करताना ते बोलत होते. या सप्ताहात दररोज दुपारी संगीतमय भावार्थ रामकथा ह.भ.प.दिलीप महाराज पवार यांच्या सुश्राव्य वाणीतून संपन्न झाली. . यावेळी बोलताना ते म्हणाले की, संत वामनभाऊंची नाळ डोंगरकिन्ही गावाशी जोडलेली आहे हे उदाहरणासह त्यांनी सांगितले. मंदिर प्रतिष्ठानच्या माध्यमातून डोंगरकिन्ही गावाची प्रतिष्ठा दिवसेंदिवस वाढत आहे ते आणखी वृध्दींगत होत राहो अशी प्रार्थना त्यांनी केली . यावेळी प्रतिष्ठानच्या वतीने उपस्थित मान्यवर , सेवेकरी, देणगीदार , गायनाचार्य ,मृदृंगाचार्य यांचा सत्कार संपन्न झाला.मोठ्या उत्साहात महाप्रसादाने सप्ताहाची समाप्ती संपन्न झाली.

## डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या उपस्थितीत संत गाडगे बाबा यांची जयंती साजरी

बीड दि २४(प्रतिनिधी)- शहरातील अंबिका चौक पोस्टमन कॉलनी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी परिसर स्वच्छ करून संत गाडगे महाराज यांची जयंती शिवसंग्राम चे अध्यक्ष ज्योतीताई मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली .

जयंतीनिमित्त बीड शहराध्यक्ष सुहास आबा पाटील, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मनिषाताई कुपकर, , सांस्कृतिक आघाडीचे जिल्हाध्यक्ष अशोक लोकरे महिला , आघाडी बीड शहराध्यक्ष संगीताताई ठोसर , कैलास शेजाळ , हरिश्चंद्र ठोसर तसेच नगरपरिषद स्वच्छता कर्मचारी व कॉलनीमधील नागरिक सावरे साहेब , अशोक कुडके , मानेताई, वाघमारेताई , पवारताई तसेच प्रभागामधील नागरिक , शिवसंग्रामचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वादळी वाऱ्यासह बीड जिल्ह्यात पाऊसाने ज्वारी,गहू आणि आंबा तसेच इतर पिकांचे अतोनात नुकसान



बीड दि २४(प्रतिनिधी) दि. रविवारी झालेल्या वादळी वाऱ्यासह पाऊस आणि वेगांच्या कडकडाटासह बीड जिल्ह्याच्या बऱ्याचशा गावामध्ये रविवार २३ फेब्रुवारी रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने शेतकऱ्यांचे ज्वारी,गहू, हरभरा, आंबा तसेच इतर पिके व बागांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे ज्वारी गहू मका हे पिके सर्वच्या सर्व भुई सपाट झालेली आहेत. तरी ज्या भागामध्ये नुकसान झाले त्या भागातील एक नुकसानीचे पंचनामे शासनाने लवकरात लवकर करून, लवकरच शासनाला रिपोर्ट द्यावा. अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू गायके यांनी प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

रविवारच्या वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाचा फटका बीड तालुक्यातील पारगाव शिरस, नवगण राजुरी, पेंडगाव आदी महसूल मंडळात खापर पांगरी, सौंदाना, दगडी साजनपूर, उमरद जहागीर, पारगाव शिरस, शहाजनपूर, कुमसी, कांबी, पेंडगाव, कामखेडा, आहेर चिंचोली, या गावांना मोठा बसला आहे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शिवाय अंबाजोगाई तालुक्यात देखील गारपीट झाल्याने हातात तोंडाशी आलेला घास गेला आहे. तेव्हा प्रशासनाने शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची नोंद घेऊन सरकार दरबारी रिपोर्ट द्यावा असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू गायके यांनी प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

## कडा येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी



आष्टी दि २४ (प्रतिनिधी)- आष्टी तालुक्यातील कडा शहरात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने महान समाजसुधारक संत गाडगेबाबा यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी संत गाडगेबाबा यांच्या समाजप्रबोधनाच्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमात विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना समाजाने संत गाडगेबाबा यांच्या शिकवणीचा अवलंब करून स्वच्छता, शिक्षण आणि सामाजिक एकोपा जपावा, असे आवाहन केले. यावेळी माजी उपसरपंच संपत कर्डीले,प्रा.डॉ.ओव्हाळ सर,अशोक जाधव,पत्रकार विनोद ढोबळे,महेंद्र जाधव,अन्सार सय्यद, किशोर घोडके,सागर घोडके, बाळासाहेब खिलारे, निखील जाधव,बंटी घोडके,प्रतिक जाधव,यश घोडके, कार्यक्रमाचे अध्यक्ष अमोल साळवे होते.प्रस्ताविक पत्रकार संदिप जाधव यांनी केले तर आभार विराज घोडके यांनी मानले.

## अनिल पानसंबळ यांची निवड

बीड दि २४ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा शिक्षक आघाडीच्या जिल्हा सरचिटणीस पदी अनिल पानसंबळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालयात जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते अनिल पानसंबळ यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी संतोष भोसले, प्रदीप सजगणे, भाऊसाहेब कदम, गिरीश चाळक, अजय चव्हाण, नितीन येळवे, नारायण गवते, विलास परजणे, उत्कर्ष बसमारे, चाळक सर, गणेश मदने, बद्रीनाथ जटाळ, सतीश कळसुले,रवींद्र कळसाने आदी मान्यवर उपस्थित होते.

## मुलाकडून त्रास होत असल्यास मुलींनी त्वरित दामिनी पथकाशी संपर्क साधावा

बीड दि २४ (प्रतिनिधी)- जिल्ह्यामध्ये मुलाकडून मुलीला त्रास होत असल्याच्या संदर्भात संबंधित मुलीने त्वरित दामिनी पथकला फोन करावा काही वेळातच पथक आपल्या मदतीला येईल असे आश्वासन बीड पोलीस दलातील दामिनी पथकाच्या वतीने करण्यात आले आहे. पुढे नमूद केले की दामिनी पथकाने टवाळखोर मुलां विरुद्ध सुरुवातीपासून मोहीम राबवली आहे ज्या मुलींनी फोन केले तक्रारी केल्या त्याची त्वरित दखल घेऊन संबंधित आवर कारवाया देखील केल्या आहेत याही उपर बीड जिल्ह्यात कुठेही मुलींना व महिलांना कोणी त्रास देत असेल तसेच शाळा परिसर, कॉलेज परिसर, शिकवणी , रस्त्यावरून जाता येताना तसेच गल्लीबोळामध्ये जाणीवपूर्वक कोणी मुलाने त्रास दिला असेल तर त्यांनी त्वरित दामिनी पथकातील पीएसआय पल्लवी जाधव मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार मीरा रेडेकर मॅडम व मोबाईल नंबर ९०७५८२६३८० या क्रमांकावर फोन करावा. अशी माहिती महिला पोलीस हवालदार शोभा जाधव यांनी कळवली आहे .

## वानगाव फाटा येथे संत तुकाराम महाराज बीज सोहळ्याचे आयोजन

मांजरसुबा दि २४(प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराज संस्थान व वै. ह.भ.प.शांतिब्रह्म गुरुवर्य रामहरी बाबा सुसंस्कार आश्रम बानगाव फाटा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तत्वज्ञ श्री संतश्रेष्ठ जगदूरू तुकाराम महाराज बीज प्रित्यर्थ २६ फेब्रुवारीपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे

वै.ह.भ.प. शांतिब्रह्म गुरुवर्य रामहरी बाबांच्या आशीर्वादाने व ह.भ.प. गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा, ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, ९ ते १२ गाथाभजन, ४ते५ प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ किर्तन व ११ ते पहाटे ४ जागर असे दैनिक कार्यक्रम संपन्न होतील.

## सौताडा येथे शिवजयंतीनिमित्त विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

पाटोदा दि २४ (प्रतिनिधी) -छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त माध्यमिक शाळा, सौताडा येथे घेण्यात आलेल्या विविध शैक्षणिक व सांस्कृतिक स्पर्धांचे बक्षीस वितरण २३ फेब्रुवारी रोजी थाटात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रामजी शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच महादेव घुले, सुभाष टेकाळे संदिप भालेराव, मनीष उबाळे, अशोक सानप, काका जाधव व अजय शिंदे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी या उद्देशाने कविता गायन, पोवाडा सादरीकरण, वक्तृत्व स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच सामान्य ज्ञान स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. उत्सव समितीच्या वतीने विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनासाठी सुमारे १५ हजार रुपयांची रोख बक्षिसे, ट्रॉफी व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक सरोदे सर यांनी केले..या कार्यक्रमास सुभाष टेकाळे, सचिन टेकाळे, दत्ता शिंदे, नितीन टेकाळे, अजय पाटील, सतीश शिंदे, प्रभाकर सानप, दिलीप सानप, अशोक सानप, गोटू सानप, ईश्वर सांगळे यांच्यासह पालक, महिला पालक व शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महामानव अभिवादन ग्रुप कडून इंदिरानगर येथे ५ व्या मोफत शिकवणी वर्गाचा प्रारंभ

बीड दि २४((प्रतिनिधी)- अंधश्रद्धा कर्मकांड व व्यसनापासून मुक्त राहुन शुद्ध अंत:करणाने निस्वार्थपणे गरिबांची सेवा करणे हेच संत गाडगेबाबांना खरे अभिवादन ठरेल असे डॉ.प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले.

इंदिरानगर येथे संत गाडगेबाबांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून महामानव अभिवादन ग्रुप घ्या वतीने पाचव्या मोफत शिकवणी वर्गाचा प्रारंभ करण्यात आला.या अभिवादन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त सी.ई.ओ. पि.व्ही. बनसोडे, तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ.पांडुरंग सुतार तर प्रमुख पाहुणे म्हणून संत गाडगेबाबा यांच्या जीवनाचे गाढे अभ्यासक संतोष डोंगरे, प्रा.डा.नामदेव शिनगारे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास प्रा.अशोक गायकवाड, एस. एस. सोनवणे, मुख्याध्यापक वैशाली शिंदे, राजेंद्र ससाने यांची विचार मंचावर उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते आदर्शांचे पुष्प दीप धुपाने पूजन करून संत गाडगेबाबा यांना पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले यांनी केले तर प्रास्ताविक राजाभाऊ आठवले यांनी केले. यावेळी राजाभाऊ आठवले , डॉ.नामदेव शिरगारे , वैशाली शिंदे यांची समायोचित भाषणे झाली. हया ०५ व्या वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी महामानव अभिवादन ग्रुप तर्फे ५३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन ) तर ४० विद्यार्थ्यांना हासुरे इंग्रजी ग्रामर हे पुस्तक मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. मोफत शिकवणी वर्गाच्या विद्यार्थ्यांनी पुरेपूर फायदा घ्यावा व पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे लक्ष द्यावे असे समजावून सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी.जी.वानखेडे यांनी व्यक्त केले.

## श्री रेणुकामाता मल्टीस्टेट माजलगाव शाखेच्या कर्ज मेळाव्यास उत्तम प्रतिसाद

माजलगाव दि.२४ (प्रतिनिधी ) - श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप अर्बन केडिट सोसायटी लिमिटेड माजलगाव शाखेच्या कर्ज मेळाव्यास उत्तम प्रतिसाद मिळाल्याची माहिती शाखेचे जुणे ठेवीदार रंगणाथ निकम सर यांनी दिली. प्रास्ताविकातून माजलगाव शाखाधिकारी परमेश्वर कुंडकर यांनी विविध प्रकारच्या कर्ज सुविधा विषयी माहिती दिली.श्री रेणुकामाता मल्टीस्टेट या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत भालेराव यांनी महाराष्ट्रात वर्षभर कर्ज सुविधा सर्व शाखेतून सुरु केली आहे. ३०,०००,५०,००० व १,००,००० रु. अशी वैयक्तिक कर्ज सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. याशिवाय कॅश क्रेडिट लोन, होम लोन, मर्गिज लोन व वाहन तारण कर्ज आदी विविध प्रकारचे कर्ज सुविधा माजलगाव शहरात व महाराष्ट्रातील सर्व शाखेत उपलब्ध करण्यात आली आहे.कर्ज सुविधा वर्षभर उपलब्ध केल्यामुळे ग्राहकांचा मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे. लोन मेळाव्यात ४ लोन फाईल सह्या घेऊण तयारच करण्यात आल्या .

# संपादकीय

## पेरले ते उगवले

पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली. इस्लामाबादमधील एका शिया पंथाच्या दर्ग्यानजीक एका आत्मघातकी मानवी बाँबने स्वतःला उडवले. या स्फोटात ३१ लोक ठार तर १६९ जण जखमी झाले. तरलाई इमामबर्ग येथे हा शक्तीशाली बाँबस्फोट झाला.आता पाकिस्तानने अफगाणिस्तानवर आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. पाकिस्तानचे म्हणणे आहे, की अफगाणिस्तानच्या दहशतवाद्यांनी स्फोट घडवला पण भारताने त्यांना आर्थिक मदत केली. पाकचा हा कुटील कांगावा आहे हे सहज लक्षात येते. कारण भारत कुणाच्याही देशात ढवळाढवळ करत नाही आणि पाकच्या उलट्या काळजाच्या देशात तो असे उद्योग करण्याची शक्यता जवळपास नाही. अद्याप कोणत्याही गटाने स्फोटाची जबाबदारी स्वीकारली नाही. तरीही पाकने अफगाणिस्तान आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. मुळात पाकने आतापर्यंत दहशतवाद्यांना पोसण्याचे काम केले. तो दहशतवाद्यांचा सरपरस्त आहे. त्यामुळे पाकचे औषध त्यालाच पाजण्यात आले. कारण पाकने आतापर्यंत हेच केले. त्याने निरपराध भारतीय नागरिकांना ठार केले. तेही शेकड्यांनी. २००८ चा बाँम्बहल्ला आणि दहशतवाद्यांचा धूडगूस आणि भारतातील ट्रेनमध्ये घडवलेले स्फोट मालिका अशी कितीतरी उदाहरणे आहे. त्यामुळे पाकवर असा दशहतवादी हल्ला झाला तर त्याबद्दल फारसे वाईट वाटण्याचे काही कारण नाही. पाकला सुसाईड बाँबहल्ले नवे नाही. तीन महिन्यांपूर्वी इस्लामाबाद येथे अशाच एका सुसाईड बाँबरने हल्ला केला होता. या हल्ल्याचा पाकचे अध्यक्ष आणि पंतप्रधान यांनी निषेध केला. पण त्यात काही अर्थ नाही. कारण आतापर्यंत पाकने जे पेरले तेच उगवले. त्यातही पाकचा खोटारडेपणा असा, की भारतावर आरोप करताना पाक हे विसरला, की भारत दुसऱ्या देशात असे उद्योग करत नसतो. हे पाकचे काम आहे. पाकिस्तानचा मित्र म्हणून चीनने या हल्ल्याचा निषेध केला. कोणताही हल्ला होणे आणि त्यात निरपराध नागरिकांचे बळी जाणे हे नेहमीच वाईट असते. पण पाकने भारतावर पूर्वी असेच हल्ले केलेत. पेहलगाम येथे निरपराध हिंदू कुटुंबियांना पाकच्या दहशतवाद्यांनी वेचून ठार केले. त्यामुळे पाकने आता कितीही व्याख्यान झोडले तरीही पाकचे कृत्य नापाक आहे हे जगापासून लपून राहिलेले नाही. पाकचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी म्हटले, की भारताने अफगाणिस्तानातील दहशतवाद्यांना पैशाची मदत केली आणि त्यामुळेच हा हल्ला झाला. पण त्यांनी कोणतेही पुरावे दिले नाही. मागेही भारतातील हल्ले पाक पुरस्कृत होते. पाकने चीनच्या मदतीने मसूद अझर याला अनेक वर्षे दहशतवादी घोषित करण्यास अडथळे आणले. त्यात चीनने आपला व्हेटो अधिकार वापरून मसूदला दहशतवादी घोषित करू दिले नाही. भारताने कित्येक वेळा पाककडे अझरला आपल्या हवाली करण्याची मागणी केली होती. पण तसे झाले नाही. तोच पाकिस्तान आता भारतावर आरोप करत आहे. खरी वस्तुस्थिती अशी आहे, की आपल्या सामाजिक रचनेला भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्याऐवजी पाकिस्तान भारत किंवा अन्य एखाद्या देशाविरोधात असे कट रचल्याचा आरोप करतात पण त्यात तथ्य नसते. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात शाब्दिक युद्ध सुरु झाले. कारण पाकचा आरोप निराधार आहे. हे भारताच्य संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले असून पाकने स्वतःची सुरक्षा यंत्रणा तपासावी आणि त्यातील कमतरता दूर कराव्यात असा सल्ला दिला. पाकिस्तानी सरकार आणि मीडिया नेहमीच असे बेजबाबदार आणि हास्यास्पद आरोप कुठल्याही पुराव्याशिवाय करतात आणि हा प्रकार त्यातलाच आहे. पाक हा नेहमीच भारत तर कधी अफगाणिस्तानवर आरोप करतो. पाकवर मृतांच्या कुटुंबियाना उत्तरे देण्याची जबाबदारी वाढत आहे आणि त्यापासून आपली सुटका करून घेण्यासाठी पाक असे डाव आखतो. इस्लामाबादमधील घटनेने केवळ देशातील प्राणघातक सुरक्षा त्रुटी उघड केल्या नाहीत तर प्रादेशिक तणावही वाढवला आहे. पाकिस्तानने दहशतवाद्यांशी लढण्यात आपण शून्य प्रगती केल्याचे दाखवून दिले. पण इस्लामाबादमधील हल्ल्याने त्यांची ही प्रगती किती नाजूक अवस्थेत आहे हे लक्षात आणून दिले. आता इस्लामिक स्टेटने या भीषण हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आणि २००८ मध्ये झालेल्या मॅरियट हॉटेलच्या बाँबस्फोटानंतर हा हल्ला इस्लामाबादेतील सर्वात भीषण हल्ला असल्याचे म्हटले आहे. पाकने चार संशयितांना अटक केली आहे. पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली. हाय प्रोफाईल हल्ले करण्याची त्यांची क्षमता कायम आहे. त्यांची पाळेमुळे सीरियाच नव्हे तर अगदी ऑस्ट्रेलियापर्यंत पसरली आहेत आणि नुकताच त्यांनी त्या देशात भीषण हल्ला घडवून १५ लोकांना ठार केले होते. गेल्या काही वर्षात पाक अफगाणिस्तान सीमेवर वाढत्या दहशतवादाचा सामना करावा लागला असला तरीही राजधानी इस्लामाबादमध्ये असा हल्ला होणे ही क्वचितच घडणारी बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने या हल्ल्याचा निषेध केला असून त्यांनी म्हटले आहे, की युद्ध गुन्ह्यांत याचा समावेश होऊ शकतो. भारताने म्हटले आहे, की पाक स्वतःच्या देशांतील सामाजिक चौकटीतील समस्या सोडवण्याऐवजी इतरांवर म्हणजे भारतावर त्याचा दोष ढकलत आहे हे अत्यंत वाईट आणि अशोभनीय आहे. शिया आणि सुन्नी मुस्लिम यांच्यात पंथीय हिंसाचार आणि वैर सर्वश्रुत आहे. त्यामुळे या शिया दर्ग्यावर हल्ला करण्यात आला आणि आयसिसच्या तत्वानुसार हे योग्य आहे. याचे आणखी एक कारण आहे ते म्हणजे शिया जमात ही आयसिसविरोधात लढण्यासाठी मनुष्यबळ पुरवते आणि हा हल्ला म्हणजे प्रत्युत्तर म्हणून हल्ला होता. राजधानीत आपण दहशतवाद पेरू शकतो आणि आयसिसची क्षमता राजधानीतही हल्ले करण्याची आहे हे दाखवून देण्यासाठी हा हल्ला होता असेही मानण्यात येते.

# शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांची बक्करवाडी येथे भव्य मिरवणूक

बीड दि २४ (प्रतिनिधी) -श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी मठाधिपती महंत गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांची दोन धाम यात्रा रामटेक नागपूर, मैहर शरद देवी, प्रयागराज, वाराणशी (काशी) गोरखपुर, पशुपतिनाथ नेपाळ,मनोकामनादेवी नेपाळ, चंद्रगिरी नेपाळ, भोलेश्वार नेपाळ, अयोध्या, चित्रकूट, मंदाकिनी नदी आरती, उज्जैन महाकालेश्वर, काळभैरव, ओंकारेश्वर, मुक्ताई नगर, बीड असा दोनधाम यात्रा प्रवास पूर्ण झाल्यावर मंगळवारी बीड येथे आगमन झाले तसे त्यांचे बीड मध्ये भव्य स्वागत करण्यात आले. तर बक्करवाडी ग्रामस्थांच्या वतीन बक्करवाडी फाटा ते बक्करवाडी येथे रथा मधून भव्य मिरवणूक काढली. यावेळी मौजवाडी फाटा येथे मौजवाडी ग्रामस्थांच्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आला. ढेकणमोहा



ग्रामस्थांच्या वतीने ढेकणमोहा येथे स्वागत करण्यात आले.

# एलआयसी विमा सखी रजनी गायकवाड यांचा गोल्ड मेडल देऊन गौरव

अंबाजोगाई दि २४(प्रतिनिधी) -भारतीय आयुर्विमा महामंडळ एलआयसीच्या माध्यमातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विमा सखी सौ. रजनी लिंबराज गायकवाड यांना अंबाजोगाई येथील भारतीय आयुर्विमा महामंडळ कार्यालय येथे नुकतेच गोल्ड मेडल देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित विशेष स्पर्धे अंतर्गत त्यांच्या कार्याची दखल घेत हा गौरव करण्यात आला. यशाचे मानकरी आणि पुरस्कार वितरण एलआयसी च्या विभागीय कार्यालया मार्फत आयोजित या स्पर्धेत सौ. रजनी लिंबराज गायकवाड यांनी आपल्या उल्लेखनीय कामाच्या जोरावर अव्वल स्थान पटकावले. त्यांना



बक्षीस स्वरूपात सन्मानचिन्ह आणि गोल्ड मेडल प्रदान करण्यात आले. यावेळी संस्थेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.एच.डी. मासाळ साहेब वरिष्ठ शाखा व्यवस्थापक, मुख्य कार्यालय अंबाजोगाई, प्रमोद पाटील साहेब शाखा व्यवस्थापक, सेल्स अंबाजोगाई, गोविंद तोडकर विकास अधिकारी, एस बी ए अंबाजोगाई हे उपस्थित होते.विमा क्षेत्रात त्यांनी दाखवलेले सातत्य आणि एलआयसी च्या कामाबद्दल ची त्यांची निष्ठा यामुळेच त्यांना हे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या यायशामुळे त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन आणि कौतुक होत आहे. विमा क्षेत्रात महिलाही आपली स्वतंत्र ओळख कशी निर्माण करू शकतात, याचे एक उत्तम उदाहरण सौ. रजनी गायकवाड यांनी घालून दिले आहे.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कार्य पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी– राज्यपाल आचार्य

मुंबई, दि. २३ : युवक, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी त्यांनी तीन दशकांहून अधिक काळ केलेले कार्य राज्याच्या सर्वच क्षेत्रांत आजही प्रकर्षाने जाणवते, असे सांगून दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव करताना राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांच्या सहज, सरळ आणि सर्वांना आपलेसे करून घेणाऱ्या स्वभावाचा विशेष उल्लेख केला. दिवंगत अजित पवार यांचे कार्य पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठेवा ठरेल आणि समाजजीवनाला दिशा देणारे ठरेल, असेही राज्यपालांनी नमूद केले.वरळी येथील एनएससीआय डोम येथे आयोजित दिवंगत अजित यांच्या श्रद्धांजली सभेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष ड राहुल नार्वेकर , विधान परिषद सभापती प्रा राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, माजी सरन्यायाधिश भूषण गवई, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, उद्योजक गौतम अदानी, मुकेश अंबानी, अभिनेते नाना पाटेकर, जॅकी श्रॉफ, मंत्रीमंडळातील मंत्री, विधानसभा आणि विधान परिषदे सदस्य उपस्थित होते.

# टाटा अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धा गेवराईचे सुनिल घाटूळ यांनी केली पूर्ण

गेवराई दि.२४ (प्रतिनिधी) :- गेवराई येथील सुनिल घाटूळ यांनी लोणावळा येथील सह्याद्रीच्या द-याखोऱ्यात संपन्न झालेल्या प्रतिष्ठित टाटा अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धा २०२६ या स्पर्धेत ३५ किलोमीटरचे खडतर आणि जीवघेणे अंतर यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. आव्हानात्मक मार्ग आणि जीवावरची वळणे, लोणावळ्याचा खडतर मार्ग त्यांच्या तीव्र चढावासाठी आणि जीव घेण्या वळणासाठी ओळखला जातो. या सर्वांवर मात करत गेवराईचे सुनिल बप्पासाहेब घाटूळ यांनी स्वप्नवत वाटणारे हे लक्ष गाठून आपला ठसा उमटवला आहे. गेवराई येथील बाळराजे कंट्रक्शनचे मालक तथा दै.सुर्योदय चे बीड जिल्हा प्रतिनिधी सुनिल बप्पासाहेब घाटूळ हे मागील सहा महिन्यापासून ग्राउंडवर रनिंग करत होते. त्यांनी आजवर महाराष्ट्रात होणाऱ्या अनेक मॅरेथॉन मध्ये भाग घेतलेला आहे. कुठे जरी मॅरेथॉन चे आयोजन केलेले असले आणि ती माहिती त्यांना मिळताच ते त्या ठिकाणी आवश्य भाग घेतात. नुकत्याच लोणावळा येथे टाटा अल्टो मॅरेथॉन स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुनिल घाटूळ यांनी भाग घेऊन अतिशय कमी वेळामध्ये ३५ किलोमीटरचे अंतर पार केले व आपला ठसा मॅरेथॉनमध्ये उमटवला. या यशामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून या पुढील मॅरेथॉन मध्ये आणखी कमी वेळात जास्त अंतर पार करण्यासाठी मी आणखीन जास्त सराव करणार असल्याचे सुनिल घाटूळ यांनी सांगितले आहे.




# माजलगावची डॉ.आंबेडकर जयंती व्यसनमुक्त व डिजे-मुक्त जयंती रुबाबदार होणार -विजय साळवे

माजलगाव दि २४ ( तुकाराम येवले)-विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंतीनिमित्त माजलगाव शहरातील एका हॉटेल येथे प्राथमिक बैठकीचे आयोजन करण्यात आले. शहरातील प्रत्येक नगरातील आंबेडकर प्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जयंती उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरी करण्याचा निर्धार व्यक्त केला.बैठकीत सर्वानुमते महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. यंदाची भीम जयंती शहरात व्यसनमुक्त व डिजे-मुक्त पद्धतीने साजरी करण्यात येणार असून प्रत्येक नगरातील जयंती समितीच्या वतीने माता रमाई यांच्या घरासाठी निधी संकलन करण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला. तसेच सार्वजनिक जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचाही ठराव मंजूर करण्यात आला.दि. २२ फेब्रुवारी रोजी झालेल्या या बैठकीस शिव-शाहू-फुले-आंबेडकर विचारधारेचे मान्यवर, नगरसेवक व भीम सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजलगाव शहरातील प्रत्येक नगरातून भीम जयंती मोठ्या



थाटामाटात पण शिस्तबद्ध व समाजोपयोगी उपक्रमांसह साजरी केली जाईल, असा विश्वास आंबेडकरी चळवळीचे नेते विजय साळवे यांनी व्यक्त केला.यावेळी कचरू खळगे, अविनाश जावळे, नवनाथ धाईजे, उत्तमराव जोगदंड, भिमराव टाकणखार, धम्मानंद साळवे, अंकुश जाधव, राजेश साळवे, विवेक पोटभरे, सदानंद प्रधान, राकेश साळवे, सचिन जावळे, अभिजित पोटभरे, सचिन उजगरे, सिद्धार्थ ससाणे, अविनाश बनसोडे, भास्कर शिंदे, राज अर्जुन, सय्यद राफिक, राजकुमार सोनवणे, ड. अमोल डोंगरे, प्रदीप साळवे, आकाश टाकणखार, केतन प्रधान, राहुल कांबळे, कपिल जावळे, मुन्ना धापसे आदींनी आपले मत मांडले.प्रसंगी गोविंद टाकणखार रुपचंद कांबळे चंद्रकांत टाकणखार अशोक जाधव कपिल वाघमारे चंद्रमणी डोंगरे दिपक कसबे तौफिक सय्यद आकाश सोनवणे अनिल कांबळे रवि सोनवणे सन्नी प्रधान अक्षय साळवे अभिषेक चौरे सिद्धांत सुरवसे विशाल साळवे अकाश घुगे बाळु साळवे विनोद टाकणखार अतुल भदर्गे बाबा दाभाडे यांच्यासह शेकडो भीमसैनिक उपस्थित होते.

# कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगे महाराजांची माजलगावात सार्वजनिक जयंती साजरी




माजलगाव दि २४ (तूकाराम येवले) - स्वच्छता आणि मानवता हा संदेश देत अनिष्ट रूढी परंपरा अंधश्रद्धा यावर कडाडून सांगणारे शिक्षण आरोग्य याला महत्त्व देणारे कृतिशील राष्ट्रसंत कर्मयोगी संत गाडगेबाबांची १५० वी सार्वजनिक जयंती माजलगावात उत्साहात साजरी करण्यात आली. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या जयंतीचे आयोजन परीट समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले होते संत गाडगेबाबा सभागृहांमध्ये आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगे महाराजांना जयंतीनिमित्त मोहनराव जगताप, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, जयसिंग सोळंके,बहुजन नेते बाबुराव पोटभरे , शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले ज्ञानेश्वर मेंडके अरुण राऊत श्रीहरी मोरे धनंजय पापा सोळंके विशाल देवकते अँड अमोल डोंगरे राजेभाऊ भिसे विलास नेमाने पद्माकर कांबळे भारत होके विजय शिंदे यांच्यासह शहरातील हजारो नागरिकांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले आहे तर समाज बांधवांच्या वतीने शेषेराव भागवत . विश्वनाथ शिंदे जगन्नाथ शिंदे .मारूती मामा शेलार . बाबुराव भागवत .विठ्ठल दळवी शिवाजी व्यावहारे . रघुनाथ मोताळे . सुभाष भागवत . लक्ष्मन वाघमारे . राम भागवत . जगन्नाथ भागवत . लक्ष्मन नवले . महादेव शेलार सुनिल शेलार . शरद मोताळे . अनिल मोताळे . श्रीराम मोताळे . आकुश भागवत . नंदु मोरे चंदर मोरे . सचिन दळवी . विज्ञान शिंदे . आविनाश शेलार पप्पु राऊत . नाथ महाराज जाधव . ज्ञानोबा नवले . इंद्रजित शेलार . प्रकाश भागवत . गजु भागवत . दत्ता शिंदे . बाबसाहेब शिंदे . नवनाथ शिंदे . आजिक्यं भागवत . रोहन भागवत . रवि भागवत . रामा मोताळे . अभिजीत भागवत . डेबु व्यावहारे . लक्ष्मण भंडारे . विश्वनाथ शिंदे शेषराव बाबासाहेब शिंदे सुनील शेलार विश्वासराव राऊत विठ्ठल दळवीभागवत जगन्नाथराव शिंदे शिवाजी व्यवहारे इंद्रजीत शेलार चंद्रकांत मोरे सर्जेराव शिंदे श्रीराम मोताळे आदी जमाज बांध मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोटरीच्या वतीने शीत शवपेटीचे लोकार्पण

## लोकांच्या दुःखात आधार देणे हीच खरी मानवता होय-निलेश वाईकर



अंबाजोगाई दि २४ (प्रतिनिधी)- लोकांच्या दुःखात आधार देणे हीच खरी मानवता आहे.असे प्रतिपादन रोटरीचे प्रांत पब्लिक इमेज डायरेक्टर निलेश वाईकर यांनी केले.

रोटरीच्या १२१ व्या वर्धापन दिनानिमित रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने उम्मीद ट्रस्ट संचलित जनसेवा हॉस्पिटल चे संचालक डॉ. तौफिक खान पठाण यांच्या कडे शीत शवपेटीचे (मोर्चुरी बॉक्स )लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून निलेश वाईकर बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून पोलिस निरीक्षक शरद जोगदंड, रोटरीच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी, सचिव मंजुषा जोशी, सहसचिव राधेश्याम लोहिया, प्रा.संतोष मोहिते पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना शरद जोगदंड म्हणाले की उपेक्षितांना प्रवाहात आणण्याचे काम विविध माध्यमातून रोटरी करीत असल्याचे त्यांनी सांगितले.या वेळी आपल्या प्रास्ताविकात प्रा.रोहिणी पाठक यांनी गरजू कुटुंबांना अत्यंत कठीण प्रसंगी सन्मानपूर्वक सुविधा उपलब्ध व्हावी, या हेतूने शीत शवपेटी उम्मीद ट्रस्ट संचलित जनसेवा हॉस्पिटल चे संचालक डॉ. तौफिक खान पठाण यांना सुपूर्द करण्यात आली आहे. यामुळे अंबाजोगाईकरांची शव शीत पेटीची गैरसोय दुर झाल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी टी.आर.एफ. डायरेक्टर डॉ नवनाथ घुगे यांना पाचव्यांदा पी.एच.एफ. झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी धनराज सोळंकी , अविनाश मुडेगावकर यांनीही मनोगत केले तर उपस्थितांचे आभार कल्याण काळे यांनी मानले.याप्रसंगी रोटरीचे ज्येष्ठ पदाधिकारी डॉ सुरेश आरसुडे ,अंगद कराड, ओमकेश दहिफळे, प्रदीप झरकर, प्रवीण चोकडा, स्वप्नील परदेशी ,मोईन शेख, शकील शेख, राजेंद्र घोडके, अजित देशमुख, गोपाल पारीख, आनंद जाजू, भीमासेन लोमटे,राम सारडा, रमेश देशमुख, बालाजी घाडगे , रुपेश रामावत अभिषेक मुंदडा,गणेश राऊत, प्रा. अजय पाठक, मयुर परदेशी, यांची उपस्थिती होती.

# गुरु तेग बहादूर यांच्या शौर्यगाथेचे समूहगानातून अभिवादन

सिंधुदुर्गनगरी, दि.२४ फेब्रुवारी (जिमाका) :- श्री गुरु तेग बहादूर यांनी तत्कालीन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुद्ध आवाज उठवत धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी आपले प्राण अर्पण केले. त्यांच्या या अद्वितीय बलिदानामुळे भारताच्या सांस्कृतिक व अध्यात्मिक अस्मितेचे रक्षण झाले. शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त शासन विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांचा गौरवशाली इतिहास जनतेपर्यंत पोहोचवत आहे. आजच्या समूहगानातून आपण गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त करत असून या उपक्रमातून नवप्रेरणा मिळत असल्याचे जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे म्हणाल्या. 'हिंद दी चादर' म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त हा समूहगान उपक्रम कणकवली येथील विद्यामंदिर माध्यमिक प्रशाला येथे घेण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, धर्मनिरपेक्षता आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा निर्माण झाली. या प्रसंगी तहसिलदार दिक्षांत देशपांडे, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, शिक्षणाधिकारी कविता शिंपी, मुख्याधिकारी गौरी पाटील, तसेच मुख्याध्यापक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांची माहिती नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचते, असे मत व्यक्त केले.

# पंचायत समिती धारूर येथे लिपिक संघटनेचे असहकार आंदोलन जाहीर

**किल्ले धारूर दि २४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत प्रशासनाचा मुख्य आधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या लिपिक संवर्गाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना, ता. किल्ले धारूर यांच्या वतीने असहकार आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.**

याबाबत संघटनेच्या वतीने जिल्हा परिषद बीड येथील मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात लिपिक संवर्गाच्या वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करून सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, पदोन्नती स्तर कमी करून पदनामात बदल करावा, तसेच दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या व प्रलंबित प्रकरणातील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. संघटनेने दि. २३ फेब्रुवारी २०२६ पूर्ण दिवस असहकार आंदोलन.संघटनेचे पदाधिकारी यांनी सांगितले की, शासनाने लवकरात लवकर मागण्यांवर सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल. दरम्यान, या आंदोलनामुळे तालुक्यातील शासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# जि.प.प्राथमिक उर्दू शाळेत विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप

अंबाजोगाई दि २४ (प्रतिनिधी)- तालुक्यातील धानोरा खुर्द येथे जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनात उत्कृष्ट नृत्य सादर केले होते तसेच शाळेत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेत सहभाग घेऊन बक्षीस जिंकले. या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण मंगळवार रोजी करून गुणगौरव करण्यात आला. जिल्हा परिषद उर्दू शाळेत विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनात तालुक्यातील धानोरा खुर्द येथे जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनात उत्कृष्ट नृत्य सादर केले होते तसेच शाळेत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेत सहभाग घेऊन बक्षीस जिंकले. या विद्यार्थ्यांना बक्षीस



वितरण मंगळवार रोजी करून गुणगौरव करण्यात आला. जिल्हा परिषद उर्दू शाळेत विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनात उत्कृष्ट नृत्य सादर केलेल्या आणि जानेवारी महिन्यात खेळाच्या स्पर्धा आणि निबंध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. प्रथम दुतीय तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह आणि शालेय साहित्य बक्षीस स्वरूपात वितरण करण्यात आले. यावेळी सरपंच पार्वतीबाई पोळ, माजी सरपंच सुरेश जगताप, शालेय समितीचे अध्यक्ष ताहेर पटेल, सिद्दिक सय्यद,महादेव जगताप,रज्जाक पटेल,लायक सय्यद, असलम सय्यद, महादेव पोळ, मोहम्मद सय्यद, बळीराम डुडुले,सूर्यकांत धायगुडे, कचरू रंजवे, उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका अंजुम शेख, नाजेमा अंजुम शेख,महमूद सय्यद यांची उपस्थिती होती.

# बीड जिल्ह्यातील बोर्ड परीक्षा

## शिस्तीचा अतिरेक की शिक्षणव्यवस्थेचे अपयश ?



**परीक्षेला ९०० पेक्षा अधिक विद्यार्थी गैरहजर का ?**

सध्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा सुरू असताना बीड जिल्ह्यात प्रशासनाने कॉपीमुक्त वातावरणासाठी अभूतपूर्व कडक उपाययोजना राबवल्या आहेत. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या आदेशानुसार सर्व परीक्षा केंद्रे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली आणण्यात आली आहेत. यासोबतच ड्रोन कॅमेऱ्यांद्वारेही परीक्षा केंद्रांवर लक्ष ठेवले जात आहे. प्रत्येक वर्गातील पर्यवेक्षकांना मोबाईलवर झूम मीटिंग सुरू ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. केंद्राबाहेरून कॉपी पुरवली गेल्यास संबंधित वर्गातील शिक्षकांवर निलंबनाची कारवाई आणि नोटीस देण्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे. पोलीस बंदोबस्त, विविध विभागांची भरारी पथके आणि माध्यमांचे कॅमेरे या सर्वांनी मिळून परीक्षा केंद्रांचे वातावरण अत्यंत कडक आणि तणावपूर्ण झाले आहे. कॉपीमुक्त परीक्षा झाल्याच पाहिजेत या दुमत असण्याचे कारण नाही. या परीक्षांमध्ये काही प्रमाणात काही परीक्षा केंद्रावर कॉप्यांचा सुळसुळाट सुद्धा पाहायला मिळतो. ते रोखणे संबंधित केंद्रप्रमुख आणि तेथील कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे त्यासोबतच पालकांची सुद्धा मोठी जबाबदारी आहे.

**सर्व यंत्रणा 'परीक्षा मोड'मध्ये**

या दोन महिन्यांच्या परीक्षाकालावधीत महसूल विभागातील तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी, शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, तसेच पंचायत समितीचे कर्मचारी यांना भरारी पथकांत नियुक्त करण्यात आले आहे. प्रशासनाची ही व्यापक हालचाल कॉपी रोखण्याच्या उद्देशाने असली तरी, प्रश्न असा उपस्थित होतो की हीच यंत्रणा वर्षभर शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी कितपत सक्रिय होती ?

**तणावमुक्त की तणावग्रस्त ?**

परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा. मात्र सध्याच्या परिस्थितीत परीक्षा केंद्रांवर काहीतरी गंभीर गुन्हा घडतो आहे अशीच भावना निर्माण होत असल्याचे पालक आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया सूचित करतात. कॅमेऱ्यांची नजर, ड्रोनची उडान, सततची ऑनलाइन निगराणी या सगळ्यामुळे अभ्यासू विद्यार्थ्यांवरही अनावश्यक मानसिक दडपण येत असल्याची चर्चा आहे. वर्गावर गार्डिंग करणारे शिक्षकसुद्धा तणावाखाली असल्याचे दिसते.



विशेष म्हणजे, जिल्ह्यातील दहावी बोर्ड परीक्षेला सुमारे ९०० पेक्षा अधिक विद्यार्थी गैरहजर असल्याची बाब चिंताजनक आहे. या विद्यार्थ्यांनी परीक्षेकडे पाठ का फिरवली ? भीती, अपुरी तयारी, मानसिक ताण की इतर सामाजिक-आर्थिक कारणे-याचा सखोल शोध घेणे अत्यावश्यक आहे.

**मूलभूत सुविधांचा प्रश्न अनुत्तरित**

बीड जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये अद्यापही मूलभूत सुविधा अपुऱ्या आहेत. काही ठिकाणी वीजपुरवठा नाही, विद्यार्थ्यांसाठी बसण्याची व्यवस्थित व्यवस्था नाही, शाळेकडे जाण्यासाठी रस्त्यांचीही दुरवस्था आहे. ग्रामीण आणि शहरी शाळांमध्ये सुविधांची दरी स्पष्ट दिसते. अनेक शिक्षक पदे सेवानिवृत्तीनंतर रिक्त आहेत; नवीन भरती होत नसल्याने विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे नियमित अध्यापन मिळत नाही. अशा स्थितीत परीक्षा काळात कठोर नियंत्रण ठेवण्यापेक्षा वर्षभरात शैक्षणिक गुणवत्ता आणि पायाभूत सुविधा सुधारण्यावर भर देणे अधिक परिणामकारक ठरले असते, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**मराठी शाळांचा अस्तित्वाचा प्रश्न**

खाजगी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मिळणाऱ्या वाढत्या प्रोत्साहनामुळे मराठी शाळा बंद पडण्याच्या उंबरठ्यावर आहेत. शासनाच्या शाळांना आवश्यक सुविधा, शिक्षक भरती आणि शैक्षणिक साधनसामग्री वेळेवर उपलब्ध झाली असती तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असता. परीक्षा काळात कडक कारवाईपेक्षा वर्षभर सकारात्मक शैक्षणिक हस्तक्षेप अधिक परिणामकारक ठरला असता, अशी भावना व्यक्त होते.

**स्पर्धा परीक्षांवरील परिणाम ?**

दहावी-बारावीच्या अनेक विद्यार्थी पुढे जेईई, नीट आणि सीईटी सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. सध्याच्या तणावपूर्ण वातावरणाचा त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर काय परिणाम होईल, याचाही विचार होणे आवश्यक आहे. आरोग्य विभागाने विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीबाबत समुपदेशन आणि आवश्यक तपासण्या केल्या पाहिजेत, अशी मागणीही पुढे येत आहे.

**जबाबदारीची दिशा**

कॉपी रोखणे आणि परीक्षा पारदर्शक ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारीच आहे. परंतु शिस्तीचा अतिरेक विद्यार्थ्यांच्या मनावर दडपण निर्माण करत असेल, तर त्या धोरणाचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे. शिक्षण हा केवळ परीक्षा-केंद्रित विषय नसून वर्षभराच्या गुणवत्तापूर्ण अध्यापनाचा परिणाम असतो. आज प्रश्न केवळ सीसीटीव्ही, ड्रोन किंवा भरारी पथकांचा नाही; प्रश्न आहे शिक्षणव्यवस्थेच्या सर्वांगीण सुधारणेचा. ९०० हून अधिक विद्यार्थी गैरहजर राहणे ही केवळ आकडेवारी नाही, तर शिक्षणप्रणाली समोरील गंभीर इशारा आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी जिथे रहमान, शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील आणि संबंधित विभागांनी या संपूर्ण परिस्थितीचे आत्मपरीक्षण करून शिक्षणाचा दर्जा, मूलभूत सुविधा, शिक्षक भरती, विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य या सर्व घटकांवर ठोस कृती आराखडा जाहीर करणे हीच काळाची गरज आहे. परीक्षा शिस्तबद्ध असाव्यात, पण त्या विद्यार्थ्यांसाठी भयाचे केंद्र न बनता आत्मविश्वासाचे व्यासपीठ ठराव्यात, हीच अपेक्षा.



**बॉटम लाईन**
**दिनकर शिंदे**
**प्रतिनिधी, गेवराई**
**मोबाईल -७३८५३९४२६०**

# ठेवीदारांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटून पुढाकार घेऊ - आ.सुरेश धस

## मुंबईतील आझाद मैदानावर घेतली ठेवीदार आंदोलकांची भेट



पाटोदा / महेश बेदरे


बीड जिल्ह्यातील विविध मल्टीस्टेट पतसंस्थांमध्ये अडकलेल्या ठेवी परत मिळाव्यात या मागणीसाठी मंगळवार, २४ फेब्रुवारी रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे ठेवीदार कृती समितीच्या वतीने प्राध्यापक सचिन उबाळे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला आमदार सुरेश धस यांनी प्रत्यक्ष भेट देत ठेवीदारांशी संवाद साधला व त्यांच्या प्रश्नावर शासनस्तरावर तोडगा काढण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले.

ज्ञानराधा मल्टीस्टेट, राजस्थानी बँक, जिजाऊ मासाहेब बँक, छत्रपती अर्बन आदी पतसंस्थांमध्ये लाखो-कोट्यवधी रुपयांच्या ठेवी अडकल्याने मागील तीन वर्षांपासून ठेवीदारांना मोठा मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर प्रा. सचिन उबाळे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन छेडण्यात आले होते. यावेळी बोलताना आमदार धस म्हणाले, "ठेवीदारांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी स्वतः व जिल्ह्यातील सर्व सहा आमदार एकत्र येऊन देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहोत. ठेवीदारांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घडवून आणण्याची विनंती करू. सुरुवातीला पाच हजार ते अडीच लाख रुपयांपर्यंतच्या छोट्या ठेवीदारांना प्राधान्याने दिलासा देण्यासाठी विशेष निर्णय घेण्याची मागणी करण्यात येईल."

ईडीकडून जप्त करण्यात आलेल्या संबंधित पतसंस्थांच्या मालमत्तेचा योग्य प्रकारे वर्ग करून त्यातून मिळणाऱ्या निधीतून प्रथम छोट्या ठेवीदारांचे पैसे परत देण्याचा मार्ग काढण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. "देवी-देवतांच्या व महापुरुषांच्या नावाचा वापर करून गोरगरिबांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही ठाम आहोत," असेही त्यांनी स्पष्ट केले.

या वेळी ठेवीदार कृती समितीचे अध्यक्ष प्रा. सचिन उबाळे पाटील ज्येष्ठ नेत्या प्राध्यापक सुशीलाताई मोराळे यांच्यासह बीड जिल्ह्यातील अनेक ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिजाऊ पब्लिक स्कूल येथे चिमुकल्याचे स्नेहसंमेलन उत्साहात



किट्टी आडगाव (प्रतिनिधी) : माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव येथील जिजाऊ पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले यावेळी विविध गाण्यावर नरते करत बालकलाकाराने उपस्थित पालक वर्गासह प्रमुख पाहुण्याची दाद मिळवली या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ भगतसर माजी सरपंच आत्माराम आबा आगे संचालक भगवान नाना आगे व अध्यक्षपदी सरपंच रुक्मानंद खेत्री शिवसेना तालुका समन्वयक वैशालीताई आगे तुकाराम सोजे तांबे काका नामदेव सोजे यांची विशेष उपस्थिती होती तसेच कार्यक्रमाला चिमुकली मोक्षदा बाबासाहेब आगे अंगद अबा आगे दिलीप आगे आसाराम राऊत पोस्टमन विष्णू पंत आगे यांची विशेष उपस्थिती लाभली कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व सरस्वती मातेच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली प्रमुख पाहुण्याचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका आश्विनी सोजे यांनी केले यानंतर जिजाऊ पब्लिक स्कूलच्या छोट्या छोट्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर करून प्रमुख पाहुणे आलेल्या पालकाचे व प्रेसेकाचे मने जिंकली व अतिशय सुंदर अशी गीते सादर केली या कार्यक्रमाला पालकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी भुलंगे मॅडम राऊत मॅडम चोरमले मॅडम अनिकेत घाटुल यांनी मोलाचे सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल वाघमारे यांनी केले.

# डॉ.घुबडे, डॉ.मायकर, डॉ.साबळे यांना आरोग्यरत्न पुरस्कार

माजलगाव(प्रतिनिधी) : आरोग्याचा ध्यास महाराष्ट्राचा विकास या लोकाभिमुख सदरामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मधुकर घुबडे, वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुरेश साबळे, प्राथमिक आरोग्य केंद्र पात्रुडचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल मायकर यांना वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला तर नित्रुड गावच्या आशा स्वयंसेविका सुवर्णा भारत ठोंगे यांचाही महाआरोग्य सन्मान २०२६ पुरस्काराने ता. २२ रविवारी मुंबई येथे सन्मानित करण्यात आले.



वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान २०२६ अंतर्गत आरोग्याचा ध्यास हाराष्ट्राचा विकास या लोकाभिमुख सदरामध्ये लोकभिमुख निर्णय, योजनेची व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्या उत्कृष्ट आरोग्य सेवा व्यवस्थापन व उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई या ठिकाणी आरोग्यमंत्री ना. प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्यमंत्री मेघना साकोरे/बोर्डीकर यांच्या हस्ते मुंबईत वरील चौघांचा सन्मान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल सर्वांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

## भगवानबाबा प्रतिष्ठानवर आज ह.भ.प.हनुमान शास्त्री महाराज यांचे कीर्तन



बीड दि.२४ (प्रतिनिधी): येथील श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानवर शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ पासून अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला आहे. या सप्ताहात भजन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार वार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.०० वाजत ह.भ.प. प्राचार्य प्रा. परशुराम महाराज मराडे यांचे प्रवचन तर सायंकाळी ६.३० ते ते ८.३० वेळात ह.भ.प. हनुमान महाराज शास्त्री, शालसिद्ध महाराज संस्थान, मिडसांगवी यांचे कीर्तन होणार आहे. श्रीसंत भगवानबाबा प्रतिष्ठानवर आयोजित प्रवचन व कीर्तनाचा भाविकांनी मोठ्या संख्येने भाग घ्यावा, असे आवाहन सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## सौ के.एसके महाविद्यालयात राष्ट्रसंत गाडगे बाबा जयंती साजरी

बीड दि.२४ (प्रतिनिधी)- सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड येथे सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी संत गाडगे बाबा यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विश्वंभर देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे, उपप्राचार्या डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. अन्सरउल्ला खान, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. काकडे तसेच पर्यवेक्षक श्री. जालिंदर कोळेकर यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी आपल्या मनोगतात संत गाडगे बाबा यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, माणसात देव शोधणारा या संताने लोकांकडून मिळालेल्या देणग्यांचा उपयोग रंजले-गांजले, अनाथ व गरजूंसाठी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम व शाळा उभारण्यासाठी केला. डॉ दुष्यंता रामटेके यांनी संत गाडगे बाबा यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या स्वच्छतादूत व राष्ट्रनिष्ठेचा आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकारावा, असे आवाहन केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

**माजलगांव येथील श्री रा.प.परदेशी जिल्हा न्यायाधिश-१ यांच्या न्यायालयात**

कि.दिवाणी अर्ज क्र. १२/२०२६

अर्जदार : सायली बडे व इतर विरुध्द गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन

**प्रकरण - कलम ८ (२) हिंदू मायनॉरिटी ॲन्ड गार्डीयनशीप ॲक्ट**

प्रति. (अर्जदार / गैरअर्जदार) ज्या आर्थी १) सायली पि. सुरेश बडे, वय-१६ धंदा शिक्षण २) श्रेयश पि. सुरेश बडे वय १२. धंदा-शिक्षण, अ.पा.क. आई नामे ३) प्रियंका भ्र. सुरेश बडे, वय-३४, धंदा घरकाम रा. भाटवडगांव त्ता. माजलगांव जि. बीड. ह.मु.बीड ता.जि.बीड ४) सुमनबाई भ्र. रामकिसन बडे वय ६८ धंदा-घरकाम, रा.गांवदरा, ता.धारुर जि.बीड यांचे नावे वारसअधारे आलेली मौजे भाटवडगांव ता. माजलगांव जि.बीड येथील ग्रामपंचायत मिळकत क.१७७/१९२ ज्याची लांबी पुर्व-पश्चिम १५ मीटर व रुंदी दक्षिण-उत्तर १२ मीटर एकुण क्षेत्रफळ १८० चौरस मीटर सदर मिळकत अज्ञान १) सायली पि.सुरेश बडे, २) श्रेयश पि. सुरेश बडे यांचे वडील नामे सुरेश रामकिसन बडे हे मयत झाल्यामुळे वारसाहक्काअधारे झालेली आहे. सदरील मिळकत विक्री करण्यास परवानगी मिळणे बाबत सदरील अर्ज अर्जदारतर्फे अ.पा.क.आई ३) प्रियंका भ्र.सुरेश बडे, वय-३४, धंदा-घरकाम रा. भाटवडगांव ता. माजलगांव जि.बीड. ह.मु.बीड ता.जि. बीड ४) सुमनबाई भ्र. रामकिसन बडे वय ६८ धंदा घरकाम, रा.गांवदरा, ता.धारुर जि.बीड यांनी या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी याद्वारे फर्माविण्यात येत आहे की सदर मिळकतीस इत्तर कोणास काही आक्षेप असेल तर त्यांनी या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासुन एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात सदर अर्जा विरुध्द कारण दाखविण्याकरीता दिनांक: २७/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे नसता कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होउन निकाल दिला जाईल.

आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

समक्ष प्रतिज्ञेवर
व.लिपीक

आदेशावरुन
अधिक्षक
जिल्हा न्यायालय, माजलगाव

**जाहीर प्रगटन**

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती अधिकार व सूचनेवरून सर्व जनतेस कळवण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी १) शशांक रामराव असनारे २) प्रकाश रामराव असनारे रा. माजलगाव ता. माजलगाव जि. बीड यांच्या मालकी व ताब्यातील शिवार मौजा माजलगाव ता. माजलगाव जि. बीड हद्दीतील सर्व्हे क्र. १०३ मधील ०० हे. १२.१० आर शेतजमीन जमीन आहे. वरील नमुद जमिनीची चतुःसीमा पुढीलप्रमाणे आहे.

**पूर्वेस :** नईम मुस्ताफा शेख यांची जमीन. **पश्चिम :** पवार यांची जमीन. **दक्षिण:** पाथरी परभणी रोड. **उत्तरेस :** लेंडाळ यांची जमीन.

वरील वर्णनाची व चतुर्सिमच्या आतील मिळकत आमचे पक्षकार यांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचा ठराव केलेला आहे. ठरावानुसार सदर मालमत्ता हि निर्विवाद बिनबोजा व नीरजोखमी असल्याची हमी व खात्री उपरोक्त नमूद मिळकत धारक यांनी दिली आहे. तरी सदर मिळकतीबाबत व्यवहाराबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत जसे की, हक्कसंबंध, चोळी, बांगडी, गहाण, तारण, दानपत्र, नोटरी दस्त, बक्षिशपत्र, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, इनाम, लेखी अथवा तोंडी खरेदीखत, बँक कर्ज, खाजगी कर्ज, शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयात मिळकत हस्तांतरण कायद्यातील कोणत्याही तरतुदीप्रमाणे सदर मिळकतीबाबत व व्यवहाराबाबत हक्क अथवा आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत नमूद पत्त्यावर सदर मिळकती बाबतच्या सर्व कागदपत्रासह संपर्क साधावा, मुदतीत कोणाचाही आक्षेप आला नाही तर कोणाचाही आक्षेप नाही असे समजून व ग्राह्य धरून सदर मिळकतीबाबत पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारे आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत.

सबब हे जाहीरप्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
**ॲड. अभिलाष माणिकचंद श्रीश्रीमाळ**
(जिल्हा व सत्र न्यायालय, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड)
मो. क्र. ८८०५३३२१११ मंगलनाथ मल्टीस्टेटच्या समोर, जुना मोंढा, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड

**जाहीरनामा**

**विलंबित मृत्यू नोंदणी आदेश मिळणेबाबत**

**जन्म-मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (२) व (३) अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, संदर्भ क्र. (४) येथील अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज सादर करुन असे कळविले आहे की, त्यांचे कुटूंबातील व्यक्तींची मृत्यू तारीख व मृत्यू ठिकाण खालीलप्रमाणे आहे.

**१) मृत व्यक्तीचे नाव : साळूबाई दुर्गाप्पा लांडगे, अर्जदाराशी असलेले नाते : अर्जदार यांची आजी, मृत्यू दिनांक : ०१/१२/२०१८, मृत्यु ठिकाण : गंगामसला**

वरीलप्रमाणे मृत व्यक्तीच्या मृत्यूची विलंबित नोंद ग्रामपंचायत अधिकारी तथा निबंधक, मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत कार्यालय गंगामासला ता. माजलगांव जि. बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन त्याबाबत मृत्यू प्रमाणपत्र मिळावे, यासाठी ग्रामपंचायत अधिकारी तथा निबंधक, मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत कार्यालय गंगामासला ता. माजलगांव, जि. बीड यांना आदेशित करणेबाबत अर्जदार यांनी संदर्भिय अर्जान्वये मागणी केलेली आहे.

करिता उक्त नमुद मृत व्यक्तीची मृत्यूची तारीख व मृत्यूचे ठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत त्याने / तिने या कार्यालयात हजर राहुन / अर्ज सादर करुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखल केल्यास अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद मृत्यूची तारीख व मृत्यूचे ठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत शासन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी माजलगांव

**जाहीर प्रगटण**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, मौजे पाढळसिंगी, ता. गेवराई, जि. बीड येथील गट क्र.२१२ मधील भगवान बापु चौधरी यांचे नावे असलेली ०३ हेक्टर ११ आर पैकी ४० आर जमीनीचा कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार जाहीर प्रगटन देणार माझे पक्षकार नामे शेख इलियास अहेमद पि. शेख महेमुद, रा. आसेफनगर, बीड ता.जि.बीड यांनी भगवान बापु चौधरी यांचेसोबत जमीन खरेदी करण्याचा व्यवहार ठरला आहे. सदरील जमीनीच्या चतुः सिमा पुढील प्रमाणे आहेत.

**पुर्वेस :** भगवान बापू चौधरी यांची उर्वरीत जमीन, **पश्चिमेस :** भगवान बापू चौधरी यांची उर्वरीत जमीन, **दक्षिणेस :** विशाखा पटनम हायवे एनएच-२२२, **उत्तरेस :** गाडी रस्ता व भगवान बापू चौधरी यांची उर्वरीत जमीन.

वरील चतुः सिमेअंतर्गत येणारी वर्णनाची जमीनी बाबत जाहीर प्रगटन देणार शेख इलियास अहेमद पि. शेख महेमुद यांनी सदरची मिळकत निर्वावाद असल्याची खात्री करुन सदरची मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचा लेखी करार केलेला आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा खरेदीविक्री, तारण, वारस, गहाण, बक्षिस, लिज, चोळीबांगडी व हस्तांतरण व ईतर मार्गाने हक्क व अधिकार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आपले आक्षेप/उजर मुळ कागदपत्रासह लेखी कळवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर जाहीर प्रगटन देणार शेख इलियास अहेमद पि. शेख महेमुद, रा. आसेफनगर, बीड ता. जि.बीड यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

करीता सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक: २३/०२/२०२६
ठिकाण : बीड

**ॲड. सय्यद सस्माईल**
जिल्हा व सत्र न्यायायल, बीड.
मो.नं. ५९८७७८८६६०४

PP

# पार्श्वभूमी

दि.२५ फेब्रुवारी २०२६ बुधवार




## चंद्रभागा उत्तम गवळी यांचे निधन



खालापुरी(प्रतिनिधी):-शिरूर कासार तालुक्यातील खालापूरी येथील चंद्रभागा उत्तम गवळी वय वर्ष ६२ यांचे अल्पशा आजारी असल्याने दि २४ मंगळवार रोजी निधन झाले. त्यांच्यावर खालापुरी येथील स्मशानभूमीत मोठ्या शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अत्यंत शांत मनमिळावू असलेल्या चंद्रभागा उत्तम गवळी नाव लौकिक होता .गेल्या काही दिवसापासून त्यांची तब्येत खालावली होती परंतु २४ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास

पान २ वर

## सौ.केएसके महाविद्यालयात राष्ट्रसंत गाडगे बाबा जयंती साजरी

बीड दि.२४ (प्रतिनिधी)- सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड येथे सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी संत गाडगे बाबा यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विश्वंभर देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे, उपप्राचार्या डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. अन्सरउल्ला खान, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. काकडे तसेच पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांची उपस्थिती होती.

# २४ महिन्यांत संपादन न केल्यास जमिनीचे आरक्षण आपोआप रद्द

### उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निवाडा

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी):- विविध सार्वजनिक प्रकल्पांसाठी केल्या जाणाऱ्या जमीन संपादन प्रक्रियेसंदर्भात उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. एकदा महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना कायदा, १९६६ च्या कलम १२७ अंतर्गत खरेदीची नोटीस बजावली आणि पुढील २४ महिन्यांत ती जमीन संपादित करण्यासाठी कोणतीही प्रभावी पावले उचलली नाहीत, तर जमिनीचे आरक्षण आपोआप रद्द होते. ती जमीन सोडलेली मानली जाते, असा आदेश न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती आभा मंत्री यांच्या खंडपीठाने सोमवारी दिला.

पुण्यातील याकुब कॉन्ट्रॅक्टर आणि झेहरा कॉन्ट्रॅक्टर यांच्या कायदेशीर वारसदारांनी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. लोणावळा नगरपरिषदेने संपादित केलेल्या जमिनीवरील आरक्षण हटवण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली. त्यावर न्यायमूर्ती रविंद्र घुगे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठापुढे सुनावणी झाली. याचिकेला प्रशासनाकडून विरोध करण्यात आला. जमीन खरेदीची नोटीस सदोष होती. त्यासोबत मालकीची कागदपत्रे नव्हती, असा युक्तिवाद करत याचिकेला विरोध करण्यात आला. तथापि, प्रशासनाचा हा युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावला.

पान २ वर

### लाईट संदर्भात तुतारी गटाने घेतली मुख्य अभियंताची

# बीड शहरातील लाईट सुरळीत ठेवा-गटनेते खुर्शीद आलम

बीड दि.२४(प्रतिनिधी):- शहरातील अनेक भागात लाईट सुरळीत नसल्याने अंधार पसरलेला दिसुन येत आहेत, अनेक भागात लाईट जाण्याचा आणि येण्याचा कोणताही वेळ राहिलेला नाही, महाराष्ट्र विद्युत मंडळाच्या गलथान कारभारामुळे शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत, सनासुधीच्या वेळेस सुध्दा लाईट सुरळीत मिळत नाही, शहरातील अनेक डि.पी. चे किटकॅट फुटुन तुकडे तुकडे झालेले आहेत तर अनेक ठिकाणी कुजलेले खांब असुन ते तुटून पडले तर मोठ्ठी जिवितहानी होण्याची शक्यता आहे तर अनेक ठिकाणी विद्युत तार लोंबकळत

पान २ वर



# स्मशानभूमीकडे जाणाऱ्या बोगस रस्त्याची चौकशी करण्यात यावी-शेख तौफिक

लवुळ दि.२४(प्रतिनिधी):- माजलगाव तालुक्यातील लवूळ क्रमांक १ येथे आत्ताच काही महिन्यापूर्वी नवीन स्मशानभूमी बांधण्यात आलेली होती व या स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता यासाठी दहा लाखांचा फंड कोणत्यातरी योजनेतून देण्यात आला होता पण हे काम अत्यंत निकृष्ट पद्धतीचे झाले असून आत्ताच या रस्त्यावरील खडी पूर्णपणे उघडी पडली असून व रस्त्यावर पाणी कमी वापरल्यामुळे भेगा पडत आहे. काही ठिकाणी तर हा रस्ता पूर्णपणे उखडलेला दिसून येत आहे. यासाठी येथील नागरिक शेख तौफिक यांनी वारंवार माजलगाव पंचायत समितीकडे या बोगस कामांची चौकशी करण्यात यावी, यासाठी गटविकास अधिकारी पंचायतसमिती माजलगाव यांना निवेदन देऊन उपोषणाचा इशारा देण्यात आला होता पण याची दखल संबंधित बांधकामविभाग यांनी वारंवार इंजिनियर व ग्रामपंचायतला सूचना देऊनही या कामाची अद्यापपर्यंत चौकशी करण्यात आलेली नाही. या कामाचे इंजिनियर जाणून-बुजून संबंधित विभागाने सूचना देऊनही टाळाटाळ करीत असल्यामुळे लाखांवर झालेल्या बोगस कामावर पाणी फेरले जाते की काय? असा संशय ग्रामस्थांतून उपस्थित होत आहे. या कामाची उच्चस्तरीय चौकशी होऊन अर्धवट राहिलेल्या कामाची आणि बोगस कामाची चौकशी करण्यात यावी व या कामाचा फंड चौकशी झाल्याशिवाय देण्यात येऊ नये. ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय लवूळ यांना निवेदन देऊन कळविण्यात येते की, या चौकशीकामी अभिलेखे उपस्थित राहून चौकशीस सहकार्य करावे, अशा सूचना संबंधित विभागाकडून देण्यात आलेल्या आहेत. हे निवेदन दि.७ जानेवारी २०२६ रोजी जिल्हापरिषद बांधकाम उपविभाग माजलगाव यांना देण्यात आलेले आहे. या विभागाने संबंधित इंजिनीयरला वारंवार सूचना देऊन व पत्रक देऊनही याची कसल्याही प्रकारची चौकशी व पाहणी अद्याप पर्यंत करण्यात आलेली नाही. तरी वरील कामाची चौकशी करून अहवाल संबंधित कार्यालयास सादर करण्यात यावा, यात

पान २ वर



# आ.सुरेश धस यांच्या सूचनेनंतर पाटोदा पोलीस ॲक्शन मोडवर

### ट्रिपल सीट,रोड रोमिओ आणि वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई ; दंड वसुली

पाटोदा दि.२४(प्रतिनिधी):-पाटोदा शहरात ट्रिपल सीट फिरत धिंगाणा घालणाऱ्या तथाकथित 'रोड रोमिओं'च्या प्रकाराची दखल घेत आ.सुरेश धस यांनी थेट बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉमत यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत कठोर कारवाईच्या सूचना दिल्या होत्या. तसेच पाटोदा पोलिसांनाही परीक्षा काळात विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. या सूचनांनंतर २४ फेब्रुवारी रोजी पाटोदा पोलीस क्शन मोडवर आले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच इतर प्रमुख ठिकाणी विशेष मोहीम राबवून ट्रिपल सीट प्रवास करणारे, भरधाव वेगाने दुचाकी चालविणारे व मोठ्या आवाजाचे सायलेन्सर लावून त्रास देणाऱ्या रोड रोमिओंवर कारवाई करण्यात आली.या कारवाईदरम्यान एकूण १३ प्रकरणे नोंदवून १२ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून त्यापैकी ८ हजार रुपयांची वसुली करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.परीक्षा काळात शहरात शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी ही मोहीम राबविण्यात आल्याचे सांगण्यात आले. आमदार सुरेश धस यांच्या सूचनेनंतर पोलिसांनी तातडीने कारवाईचा बडगा उगारल्याने नियम मोडणाऱ्यांमध्ये धाक निर्माण झाला आहे.

## जि.प.कें.प्रा.शाळा कडा नंबर एक या शाळेचे ४८ विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण

कडा (बा. म .पवार )::: महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे मार्फत राष्ट्रीयआर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती योजना परीक्षा २०२५. २६ मध्ये कडा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नंबर एक या शाळेचे तब्बल ४८ विद्यार्थी एन एम एम एस परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाले असून या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व सदस्य व मुख्याध्यापक तसेच शिक्षण प्रेमी नागरिकांनी अभिनंदन केले आहे

२४ फेब्रुवारी २०२६ रोजी लागलेल्या निकालात ४८ विद्यार्थ्यांचे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये यश मिळाले असल्याची माहिती विभाग प्रमुख नितीन करडूळे सर यांनी दिली सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत त्यांच्या यशाबद्दल कडा गावचे प्रथम नागरिक सरपंच लताबाई भीमराव पाटील,उपसरपंच दीपक कर्डिले गटशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे ,शाळा व्यवस्थापन समिती

पान २ वर

# स्वच्छता हीच सेवा हा संत गाडगे महाराजांचा संदेश आजही प्रेरणादायी-डॉ.क्षीरसागर

### बीडमध्ये राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम



बीड दि.२४ (प्रतिनिधी):- राष्ट्रसंत गाडगे महाराजांनी कीर्तनांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. स्वच्छता हीच सेवा हा त्यांचा संदेश आजही प्रेरणादायी आहे. गावोगावी स्वच्छतेची व्यापक चळवळ उभी करत त्यांनी समाजपरिवर्तनाची दिशा दिली. दीन-दुबळ्यांची सेवा, शिक्षणाचा प्रसार आणि समाजातील वाईट प्रथांविरोधात त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे विचार आजही समाजाला दिशादर्शक ठरत आहेत, असे प्रतिपादन भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

बीड शहरात स्वच्छता, समाजसेवा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि.२३) राष्ट्रसंत गाडगे महाराज पुतळा परिसरात त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर अतिथी म्हणून बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की, गाडगे महाराजांनी

पान २ वर

## मुस्लिम समाजाच्या ५ टक्के आरक्षणासाठी सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठान आक्रमक

**बीडसह बारा जिल्ह्यात एकाचवेळी जिल्हाधिकाऱ्यांना**



बीड ( प्रतिनिधी ) राज्य शासनाने रद्द केलेल्या मुस्लिम समाजाच्या ५ टक्के आरक्षणाच्या निर्णयाविरोधात सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठानने ठाम भूमिका घेत आक्रमक पवित्रा स्वीकारला आहे. या पार्श्वभूमीवर प्रतिष्ठानतर्फे एकाच वेळी तब्बल बारा जिल्ह्यांतून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. बीडमध्ये सप्तरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरबाज पठाण यांनी सहकाऱ्यांसह जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. राज्य शासनाने २०१४ मध्ये दिलेल्या अध्यादेशाच्या आधारे मुस्लिम समाजाला शिक्षण व नोकरीत ५ टक्के आरक्षण जाहीर केले होते. मात्र



पान २ वर

# भारत टी २० वर्ल्ड कपच्या उपांत्य फेरीत कसा पोहोचणार?

चेन्नई दि.२४ (वृत्तसेवा):- भारताचा टी २० वर्ल्ड कपमधील सुपर ८ मधील लढतीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पराभव झाला होता. या पराभवानंतर भारताचा उपांत्य फेरीत पोहोचण्याचा मार्ग खडतर झाला आहे. वेस्ट इंडिजनं झिम्बाब्वेवर १०७ धावांनी विजय मिळवत ग्रुप १ मध्ये अव्वल स्थान पटकावलं आहे. तर, दुसऱ्या स्थानी दक्षिण आफ्रिका आहे. यामुळं भारत उपांत्य फेरीत कशाप्रकारे पोहोचणार याकडे क्रिकेट चाहत्यांचं लक्ष लागलं आहे.

टी २० वर्ल्ड कपच्या उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी भारतासाठी सध्या तीन समीकरणं महत्त्वाची आहेत. यापैकी दोन समीकरण अशी आहेत, ज्यात नेट रनरेटचा मुद्दा येत नाही. एका समीकरणामध्ये नेट रनरेटचा विचार करावा लागतो. नेट रनरेटचा मुद्दा आल्यास ते समीकरण भारतासाठी अडचणीचं ठरु शकते.

भारतानं सुपर ८ मधील तीन पैकी एका सामन्यात पराभव स्वीकारला आहे. उपांत्य फेरीची आशा जिवंत ठेवायची असल्यास भारताला दोन सामने जिंकावे लागतील. एका

पान २ वर

# 'एकात्म मानवदर्शन' म्हणजे शाश्वत विकासाचा मार्ग-डॉ.उपेंद्र कुलकर्णी



बीड दि.२४(प्रतिनिधी):-देशात शाश्वत विकास जर साधायचा असेल तर पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या एकात्म मानवदर्शनाचा मार्ग हा सर्वोत्तम आहे असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्राचे प्रकल्प संचालक डॉ. उपेंद्र कुलकर्णी यांनी केले. येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात आयोजित एकात्म मानवदर्शन राष्ट्रीय सांगोष्टीच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पि.के. कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, सांगोष्टीचे निमंत्रक डॉ.हंसराज जोशी, आयोजन सचिव डॉ.अनंत देशपांडे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. उपेंद्र कुलकर्णी म्हणाले की पंडितजींनी देशातील सर्व घटकांचा सर्व परिस्थितीचा विचार करून मानव जातीच्या समग्र विकासाची संकल्पना मांडली. माणसाला व्यक्तीला समोर ठेवून त्यांनी केलेले हे चिंतन आहे. एकात्म मानवदर्शन शाश्वत विकासाचे मॉडेल आहे. कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य म्हणाले पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारतीय समाजाचा विचार करून सर्वांच्या प्रगतीसाठी हे सूत्र मांडले. त्यांच्या या चिंतनाला आज साठ वर्षे पूर्ण झाले आहेत. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार प्रेरणादायी आहेत. हंसराज जोशी यांनी या प्रसंगी दिवसभरातील सत्रांचा आढावा मांडला. यावेळी उपस्थित सहभागी प्रतिनिधींच्या वतीने डॉ. रवी साठभाई, प्रा. सोनू गवळी यांनी मनोगत व्यक्त केले. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन कंदले यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, कॉन्फरन्स साठी उपस्थित प्रतिनिधी, विद्यार्थी उपस्थित होते.

## अवैध वाळू उपशावर कारवाई

बीड (प्रतिनिधी) जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत दोन ट्रॅक्टरसह मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.बीड जिल्ह्यात वाळू घाटांचा लिलाव झाल्यानंतर काही ठिकाणी चोरट्या मार्गाने विनापरवाना व विनारॉयल्टी वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. महसूल विभाग आणि स्थानिक पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा देखील सुरू आहे.दि. २४ फेब्रुवारी रोजी पोलीस स्टेशन गेवराई हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहिती मिळाली की खामगाव शिवारात नदीपात्रातून ट्रॅक्टरच्या साहाय्याने वाळू उपसा सुरू आहे. माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ छापा टाकला. छाप्यात दोन ट्रॅक्टर आणि दोन केन्या आढळून आल्या. घटनास्थळी ट्रॅक्टर चालवणाऱ्या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.



बीड- १९-०१-२०२६ रोजी जैन भवन, बीड येथे ''जॉन डियर ट्रॅक्टर्स'' कार्यक्रम समारंभात ४० वर्षे सेवापूर्ती निमित्त ''कोटेचा अॅण्ड सन्स'' यांचे सर्वेसर्वा रमनसेठ कोटेचा व 'जॉन डियर ट्रॅक्टर्स'चे एम.डी. राजेश सिन्हा यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन दिपक विजयराव धोंगडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर सागर कोटेचा, सुमित कोटेचा व जॉनडियर ट्रॅक्टर्स टीम बीड यांच्यातर्फे शुभेच्छा देण्यात आल्या.

# जि.प.तळवट बोरगावच्या विद्यार्थ्यांची वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

बंगळूर दि.२४(प्रतिनिधी):- येथील स्ट्रॅटाबिझ व्हेंचर्स अंतर्गत कार्यरत असणारी राष्ट्रविद्या गीत ही एनजीओ स्वयंसेवी संस्था आणि सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने भारताच्या व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या जागतिक स्तरावरील भारताचे राष्ट्रगीत गायन कार्यक्रमात गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी वैशिष्ट्यपूर्ण रीतीने सहभाग घेतल्याबद्दल शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी यांची जागतिक स्तरावरील सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद घेण्यात आली आहे. बंगळुरू येथील व्यवसाय सल्लागार कँपनी स्ट्रॅटाबिझ व्हेंचर्सची सामाजिक सेवा शाखा म्हणून, राष्ट्रविद्या गीत भारतातील तरुणांसाठी अर्थपूर्ण आणि आकर्षक राष्ट्रीय स्तरावरील उपक्रम तयार करण्याचे काम करते.स्ट्रॅटाबिझ व्हेंचर्स हा सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचा कँट्री बिझनेस लायसन्स होल्डर देखील आहे.राष्ट्रविद्या गीत अंतर्गत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमातून देशाच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थ्यांना एकत्र आणण्यासाठी, देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी आणि भारताच्या एकतेचा आणि विविधतेचा अनुभव देण्यासाठी कार्यरत असणारी एक एनजीओ संस्था आहे. या कार्यक्रमाचा उद्देश एक भारतीय राष्ट्रीय विक्रम तयार करणे आहे, जो सायबर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सद्वारे सत्यापित, प्रमाणित आणि प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांचा राष्ट्राशी असलेला संबंध दृढ करणे,विविध राज्ये, संस्कृती आणि भाषांतील विद्यार्थी एकाच व्यासपीठावर एकत्रित करून विविधतेतील एकता सादर करत भारताच्या खऱ्या आत्म्याचे प्रतीक विद्यार्थ्यांच्या अंगी निर्माण करणे यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.राष्ट्रविद्या गीत पुढील पिढीला देशभक्तीच्या भावनेने सक्षम करण्यासाठी आणि विद्यार्थी एकत्र येऊ शकतील, भारतीय म्हणून त्यांची ओळख साजरी करू शकतील आणि अर्थपूर्ण मार्गांनी

पान २ वर


**दिनेश एन्टरप्रायजेस**

माळीवेस, सुभाष रोड, बीड.

Mob.9421357447

9225802952

1) सेल्समन पाहिजेत - 2 महिला /पुरुष

2) दुकान कामासाठी मुले पाहिजेत - 2

सेल्समन - IFB, LLOYD

3) दुकान कामासाठी महिला पाहिजेत - 2

4) गाडी ड्रायव्हर - 1

योग्य पगार दिला जाईल